# मर्ढेकरांची
# कविता

सन १९५८

# मर्ढेकरांची कविता

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 27566 दि: 3/3/58
क्रमांक १४२ मर्ढे

# मर्ढेकरांची कविता

दा. क्र. १०६०४

बाळ सीताराम मर्ढेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

मौज प्रकाशन गृह, मुंबई

किंमत पांच रुपये

मौज प्रकाशन : ३४

पहिली आवृत्ति :
१० फेब्रुवारी, १९५९

सर्व अधिकार
श्रीमती अंजना मर्ढेकर
यांच्याकडे

वेष्टनावरील चित्र
द. ग. गोडसे

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन-गृह
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

या संग्रहांत कै. मर्ढेकरांच्या उपलब्ध झालेल्या सर्व प्रकाशित कविता एकत्र केल्या आहेत. लिहिलेली प्रत्येक कविता आपल्या डायरींत नीट उतरवून संग्रहीं ठेवायची मर्ढेकरांची रीत होती. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची समग्र कविता प्रसिद्ध करावी असें ठरविलें, तेव्हां त्यांच्या या डायऱ्या मिळवाव्या, त्यावरून त्यांच्या कवितांचे पाठ नक्की करावे, त्यांच्या बाह्य रचनेचें रूप ठरवावें, आणि इष्ट वाटलें तर त्या कवितांच्या रचनाकालानुसार संग्रहांत त्यांचा क्रम ठरवावा,—निदान रचनेच्या स्थलकालाविषयींचे तपशील वाचकांना उपलब्ध करून द्यावे,—असा संकल्प केला होता. या ना त्या कारणानें गेल्या दोन-अडीच वर्षांत तें जमलें नाहीं. तें पुढेंमागें शक्य होईल असा विश्वास वाटत असला, तरी तूर्त त्यासाठीं अधिक न थांबतां 'शिशिरागम', 'कांहीं कविता', 'आणखी कांहीं कविता' हे मर्ढेकरांचे तीन संग्रह आणि त्या संग्रहांत नसलेल्या आणखी कांहीं प्रकाशित कविता एकत्र कराव्या असें ठरविलें.

सर्व कवितांचें मूळ हस्तलिखित जरी उपलब्ध झालें नाहीं, तरीहि प्रस्तुत संग्रहांतील कवितांची संहिता शक्य तितकी शुद्ध असावी, असा प्रयत्न केला आहे. अगदीं 'शिशिरागमा'पासून पाहिलें तरी मर्ढेकरांच्या रचनेमध्यें शब्दांचें रूप, वाक्यांची मोडणी, विरामचिन्हांचा वापर, ओळींची रचना यांच्या बाबतींत आशयाशीं संवादी असा वैशिष्ट्यपूर्ण व कांटेकोर साक्षेप बाळगण्याचा प्रयत्न आढळतो. तथापि संग्रहाच्या छपाईमध्यें तो सर्वत्र पाळला गेला आहेच, असें मात्र म्हणवत नाहीं. तेव्हां या बाबतींत मर्ढेकरांच्या रचनेंत उत्तरोत्तर विकास पावत गेलेली व 'आणखी कांहीं कवितां'त व्यक्त झालेली जाणीव लक्षांत घेऊन प्रस्तुत संग्रह छापतांना हे सर्व तपशील नक्की केले आहेत. त्यामुळें एखाद्या कवितेची मांडणीहि पूर्वींपेक्षां वेगळी झालेली दिसेल. 'शिशिरागमां'-तील सहाव्या कवितेचें उदाहरण या संदर्भांत ठळक आहे. या कवितेचा आशय पाहिला, तर आधींच्या कवितांप्रमाणें हेंहि सुनीत असलें पाहिजे;

त्याहून वेगळ्या रचनेचें तिथें औचित्य नाहीं; परंतु 'शिशिरागमा'च्या छापील पृष्ठाच्या छोट्या आकारांत मंदारमालेची दीर्घ ओळ सलग बसेना, म्हणून छापतांना ओळी तोडून कवितेची वेगळी रचना केली असली पाहिजे;—असें उघड दिसतें. प्रस्तुत संग्रहांत तिचें स्वाभाविक रूप ठरवून तें दिलें आहे. मूळ संग्रहांशीं तुलना केली कीं, प्रस्तुत संग्रहाची संहिता तयार करतांना केलेले बारीकसारीक बदल सहज ध्यानांत येतील, आणि त्यांचें औचित्य व समर्पकता वाचकांना पटेल, अशी उमेद वाटते.

कवितांची संहिता ठरवतांना त्या त्या कवितेचा आशय आणि मर्ढेकरांची रचनाविषयक जाणीव यांचा जसा विचार केला, त्याचप्रमाणें आणखीहि एका साधनाचा उपयोग केला आहे. 'अभिरुची'चे संपादक श्री. पु. आ. चित्रे व सौ. विमल चित्रे यांच्या संग्रहीं 'नाठाळ गाथा' नांवाचें मर्ढेकरांच्या छत्तीस कवितांच्या संग्रहाचें हस्तलिखित होतें. त्यांतील तेहेतीस कविता पुढें मर्ढेकरांनीं 'कांहीं कवितां'मध्यें समाविष्ट केल्या. (उरलेल्या तीन प्रस्तुत संग्रहांत शेवटच्या विभागांत सुरुवातीलाच दिल्या आहेत.) 'नाठाळ गाथे'चें हें हस्तलिखित चित्र्यांनीं प्रस्तुत संग्रहासाठीं उपलब्ध केलें. त्याचप्रमाणें 'आणखी कांहीं कवितां'चें हस्तलिखितहि तो संग्रह छापल्यानतर जपून ठेवलेलें माझ्याजवळ होतें. या दोन्ही हस्तलिखितांचा संहिता ठरविण्याच्या कामांत आधार म्हणून फार उपयोग झाला.

'नाठाळ गाथे'चें मूल्यवान हस्तलिखित तत्परतेनें उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. व सौ. चित्रे यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों. कविता गोळा करण्यामध्यें वा. वि. भट व ग. रा. कामत यांनीं साहाय्य केलें. श्री. बा. रानडे यांनीं परिशिष्टांत 'शिशिरागमा'चें आपलें प्रास्ताविक समाविष्ट करूं दिलें. आणि संहिता निश्चित करण्याच्या बिकट व जबाबदारीच्या कामांत कवि विंदा करंदीकरांनीं इतक्या आस्थेनें व बारकाईनें लक्ष पुरविलें कीं त्यांतील बहुतांश श्रेय त्यांचेंच आहे. या सर्वांचा मी ऋणी आहें.


—श्री. पु. भा.

## अनुक्रम


| | |
|---|---|
| शिशिरागम | १ ते २६ |
| कांहीं कविता | २७ ते ९६ |
| आणखी कांहीं कविता | ९७ ते १५० |
| असंग्रहित | १५१ ते १६४ |
| परिशिष्ट | १६५–१६६ |

## शुद्धिपत्र

| पान | कवितेची ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | १० | …अश्रू जो तेथुनी, पडणार तोंच… | …अश्रू जो तेथुनी पडणार, तोंच… |
| १६ | ९ | …दिनशीं | …दीनशीं. |
| १८ | १० | …वेड लावी ? | …वेड लावी ! |
| ३० | २३ | क्षमस्व अहंता | क्षमस्व अहंता; |
| ३५ | ११ | …परमाणू-राशी | …परमाणू-राशी; |
| ३६ | ७ | सात्त बैसे… | सत्ता बैसे… |
| ३९ | ३ | वाडे शक्ती | …वाढे शक्ती |
| ६७ | १ | पचगव्य-शर… | पंचगव्य-शर… |
| ८१ | १० | …हा पाश | …हा पाश; |
| ९० | २ | पाहुनी | पाहुनी; |
| ११० | ४ | वुद्धगयेचा… | बुद्धगयेचा… |
| ११७ | ८ | …ही स्कायस्क्रपर | …ही स्कायस्क्रेपर |
| ११८ | ९ | …मर्ढकरच्या | …मर्ढेकरच्या |
| ११९ | ७ | …रक्त | …रक्त, |
| १२५ | १४ | …दुःख-लाग् | …दुःख-लॉग् |
| १३४ | २ | …जाणार जाणार | …जाणार जाणार; |
| | ८ | …सालंचे | …सालंचे. |
| | ९ | …कची चाड, | …कैची चाड, |
| १४४ | १७ | चडेल… | चढेल… |
| १५३ | २० | दैवी दोषी,… | दैव दोषी,… |



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम २४५६० दि: ३/०८
क्रमांक ९२२६० नों: दि: ३/३

# शि शि रा ग म

सूर कशाचे वातावरणीं ?
सळसळ पानांची ? वा झरणी
खळखळ, ओहोटीचें पाणी ?
किल्‌बिल शिशिरीं केविलवाणी ?

कुणास ठाउक ! डोळ्यां पाणी
व्यर्थ आणतां; नच गाऱ्हाणीं
अर्थ; हासुनी वाचा सजणी.
भास !—जरी हो खुपल्यावाणी.

## शिशिरागम

शिशिरर्तुच्या पुनरागमें,
एकेक पान गळावया
कां लागतां मज येतसे
न कळे उगाच रडावया.
पानांत जीं निजलीं इथें
इवलीं सुकोमल पाखरें,
जातील सांग अतां कुठें ?
निष्पर्ण झाडिंत कापरें !

फुलली असेल तुझ्या परी,
बागेंतली बकुलावली;
वाळूंत निर्झर-बासरी;
किति गोड ऊब महीतलीं !
येतील हीं उडुनी तिथें,
इवलीं सुकोमल पाखरें,
पानांत जीं निजलीं इथें.
निष्पर्ण झाडिंत कापरें !
पुसतों सुहास, स्मरुनियां
तुज आसवें, जरि लागलें
एकेक पान गळावया
शिशिरर्तुच्या पुनरागमें.

.२.

दा. क्र. ९०८०६

माळावरल्या बांधावरतीं विलोलनयना जरा
थांबली कटीं ठेवुनी करा.

पश्चिमभागीं बाल कुणि तरी देवदूत चिमुकला
चितारित मेघावलि रंगला.
नीलाकाशीं शुभ्र कापसी खवल्यांवर जांभळी
झांक ही हलक्या हातें दिली.
डोळ्याखालीं अफाट माळहि थेट पुढें लागला,
तयावर आम्रवृक्ष एकला.
मोहर भरला, चूतमंजिरी उन्मादक परिमला
पसरवी लोभविण्या गे तुला.
चरतां चरतां दूर पांगल्या गाई कुरणावरी
चालल्या ओढ्याकाठुन घरीं.

नजर नाचरी नागसुंदरी विलासिनी रोखुनी,
झरझरा जातांना हासुनी,
गालावरल्या गोड खळीनें शराब जी सांडली
मुशाफिर-तृषा तिनें भागली.

.३.

तीरावरल्या भव्य शिळेवर एकाकी बैसुनी,
हाससी काय जळीं निरखुनी ?

मंद विखुरती मेघ गुलाबी गगनीं, अवनीतलीं
गुलाबी पडली तत्सावली.
पादाग्राला चुंबुनि जातां झुळझुळणारें जल,
वाढवी कोमलता निर्मल.
तृणांकुरांवर बागडणारीं बारिक पिवळीं फुलें
पहुडलीं पदराखालीं पिलें.
हिरवी राई पार पसरली हासत हलते तुला,
चालल्या कानगोष्टि कोठल्या ?
पल्लवभारें तव शीरावर लवलेल्या वेलिनें
कांहिं ना वनराणीला उणें !

मंजुल पवनीं तरल लकेरी स्तब्ध करी पावलां,
सुचावा मार्ग कसा, जरि खुला ?
सौंदर्याचें जगतावरतीं पसरे बघ चांदणें
राहिलें काय अता मागणें !

.४.

वाचन-मग्ना पर्णकुटीच्या दारिं उभी टेकुनी,
कपोला अंगुलिवर ठेवुनी.

सडा शिंपुनी प्रातःकाळीं, सुंदर संमार्जुनी,
काढली रांगोळी अंगणीं.
कडेकडेनें गुलाब फुलला टपोर कलिका किती
लाजुनी अर्ध्या तुज हासती.
बाल हरिण तव धावत येतां अनिमिष बघ लोचनीं,
राहिला पाहत तुज थबकुनी.
तिरपा डोंगर-कडा भयंकर सरळ तुटे खालतीं,
मागुनी सूर्यकिरण फाकती.
झाडांवरलें पान हलेना, स्थिरचर संमोहुनी
जाहले मग्न तुझ्या चिंतनीं.

पवनीं भरल्या अलकसुगंधें राणी बेहोषुनी,
भारलों निश्चल त्वद्दर्शनीं !

गुलाब, जाई फुललेली । वाऱ्यावर करिती केली;
हास गडे त्यांच्यासंगें । सुमहृदया माला तूं गे;
नयनामधिं निर्मल पाणी । सस्मित मधु अधरीं गाणीं;
गात गात आनंदूनी । नंदनवन बनवी अवनी.

मिटलेल्या कोमल कलिका । पानांमधि लपवी लतिका;
एकेकिस शोधुनि काढी । चुंबुनि ती फुलवी वेडी.
—हात नका लावूं कुणिही । कोमेजुन जातिल बाई;
शब्द नका काढूं कुणिही । लपविल ही नाजुक जाई.—

सुमकेसरकुंतल उडती । पवनावर पोहत तरती;
मंद गंध भवतीं भरती । पानपुष्प पुलकित करिती.
वर्षांच्या मागुनि वर्षें । जातिल तरि विसरुनि हर्षें;
पाहत तुज राहिन ऐसा । आनंदित वेडा जैसा.

चकित परी तन्मयता ही । प्रश्न करी आश्चर्यें कीं,
स्वर्गातिल सौंदर्याला । बहर कसा भूवर आला !

. ६.

दिव्यात्म प्रस्फूर्त हृद्गीत हें गोड गाईल कोणास गुंजारवीं ?
आवेगुनी अंतरींचा उमाळा दाटून येतां कुठें ओतणें ?
उत्फुल्ल हृत्पुष्प ! आशादलांचा खुले रंग ! भोळी चढे टव्टवी !
तत्केसरांच्या सुवासी परागां कुणां केस-भांगांतुनी पेरणें ?
उत्तुंग लाटा समुल्लोलुनी या सुहृत्सागराच्या नभीं चालल्या;
ही फेनमाला स्वर्गस्थिता कोण घेईल का तारका झेलुनी ?
मज्जीवनाच्या पहाटेस वृत्ती मनींच्या अशा तीव्र आतूरल्या;
शोधार्थ अदृष्ट रूपा ! म्हणूनी किती भागलों वाट ही चालुनी !
कुणी हासलीं; रम्य गोष्टी कुणांच्या; कुणी स्पर्शुनी अंग बेहोषवी;
कुणी लोभलीं; लोभ झाला कुणांचा; कुणी कींवलीं व्यर्थ रस्त्यावरी;
कित्येक ऐशीं ! भ्रमिष्टापरी मी तरी—अंतरीं एकला !—आळवीं
रूपास, ज्या तें दिसेना कुठेंही जरी थांबला सूर्य माथ्यावरी.

तें रूप येथें ! न् समुद्धारिणी भक्ति निःशब्द त्वल्लीन हो हर्षुनी
हा हाय ! निस्सार तों पार्थिवत्वांत निभ्रांत तूं राहसी गुंगुनी.

.७.

कोणी नको अन् कांहीं नको, देवता तूं एकली !
हृदय जीतें अर्पिलें हें होउनी बद्धांजली !
वाटभर गे हा फुपाटा; पाय जाती पोळुनी;
सौंदर्य तूझें—सावली ही ! सार्थ झाली चालणी.
आग पोटीं भावनेची ! 'घाल तुकडा भाकरी',
—हीहि परि गे, याचना ना आज तूझ्या मंदिरीं.
मन्मनाच्या माळरानीं भावना-झुडुपें जिथें
तग न धरिती, प्रेम-तरु गे, फोफावणें कैंचा तिथें !
जीविताचें ऊन विश्वीं जोंवरीं हें तापतें,
फक्त तूझ्या दर्शनाची ही पिपासा लागते.

सौंदर्य-देवि सुहास, तूं ! मी फक्त आतुर दर्शना;
मेल्यावरी तर हीहि गे, उरणार नाहिं तहान ना !

.८.

सुन्न झालें मन, सुन्न भावना या,
भोवतालीं पसरली रात्र-छाया;
पावसाचा चुकविण्या मार घेती
पांघरूनी अंधार घरें रस्तीं.
“—व्यर्थ येतां कां? प्रेम कधीं माझें
—शक्य नाहीं”—उतरिलें तिथें ओझें
बंद दाराशीं मम मुग्ध भावनांचें;
आणि धरिला मम मार्ग सिधा...
पावसाळी अंधार-गारठ्यांत
काकडूनी हम-मार्ग-दिवे जात;
चिंब ओला जाहलों आणि थेट
दारुगुत्त्याला दिली प्रथम-भेट!
भेट शेवटली तशी प्रथम तीच.
झोंपडीला परतवी माय-खेंच.
माय असते, बाईल जरी नाहीं,
प्रेमवंतां तशि प्रेमवंचितांही.
दिवस झाले कित्येक त्या प्रसंगा;
आज आलों शोधीत गेह-रांगा;
बंद आहे तव दार; परी ओझें
आंत नेलें उचलुनी कुणीं माझें?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम २७६५० वि.०५/०४.
क्रमांक ...९४२७०... नों: दि: ३/८/३

.९.

हां हां थांब ! नको सुहास, गमवूं तोंडांतलीं मौक्तिकें;
"देवाच्या घरचाच न्याय असला !" प्रश्नास दे उत्तर.
"झाला खेळ, अतां पुरे !" वद असें धिक्कारुनी कौतुकें,
जातांना उपहास-हास्य-ध्वनिही पाडीत कानांवर.
काळी भीषण रात्र कापित निघे हृत्स्वामिनी भेटण्या;
काळा फत्तर तोंच होउनी पडे तारा सहाऱ्यावर.
स्वर्गाच्या मग मंदिरीं चमकती जेव्हां सख्या चांदण्या,
किंचित् हासुनि तारका खुणवितें—"आतां कळे अंतर !"

झाला अंक समाप्त एक ! बदले ही भूमिका, वेष हा;
मी रस्त्यांतिल गे भिकार कवि, तूं प्रासादशृंगीं रहा !

१०.

आतां अंत कशास पाहसि ? अतां आभाळलें अंतरीं;
विश्वाची घटना मला न उमगे; मानव्यता दुर्बळ.
केलें पाप असेल जें कधि तरी मी जन्मजन्मांतरीं,
प्रायश्चित्त तदर्थ ना म्हणुनि गा, पाठीवरी हे वळ ?
न्यायाच्या निज मंदिरांत बसुनी साक्षीपुराव्याविना,
किंवा काय गुन्हा असेल घडला सांगीतल्यावाचुन,
न्यायाधीश असेल मानव तरी शिक्षा सुनावीत ना;
देवाची परि न्यायरीति असलें पाळील का बंधन !
होवो तृप्त—तथास्तु !—निर्घृण प्रभो, ही न्यायतृष्णा तुझी;
फासाला चढल्यावरी नच दया याची, जरी पामर;
भूतां अप्रतिकारिता श्रमविते यंत्रापरि शक्ति जी,
तीतें एक सहिष्णुता अचल अन् निःशब्द हें उत्तर.

किंवा हार्दिक बेइमान ठरतो नित्यांतला सत्क्रम,
तेथें प्रेमच एकनिष्ठ घडलें अक्षम्य दुर्वर्तन !

. ११.

मायावी गुजगोष्टि गुल्गुल् मुदें; आलिंगनीं तत्पर;
किंवा चुंबनलोलुप स्मित सदा ओठावरी नाचरें !
झालीं दंग सुहास, प्रेम-युगुलें ऐशीं मजेखातर;
—विश्वाच्या बगिच्यांत हीं भिरकिती कालांबरीं पांखरें.
हासे ज्यां क्षणभंगुरत्व विजयें वाखाणुनी कौतुकें,
लीला या लटक्या बघून निमिषोत्फुल्ल सुदैवानिलें;
माझेंही तुज प्रेम काय गमलें या टर्फलांसारिखें,
ज्यांच्यांतील जिवंत जीवनरसा सौख्यें असे शोषिलें ?
नाहीं—! मद्‌हृदयीं सुरा खुपसतां मी आत्महत्येस्तव,
रक्ताची चिळकांडि ही उसळुनी एका कमानींतुन
येवोनी भिजवील कोमल तशा या शुभ्र पायां तव;
अन् तो स्रोत अखंड वाहिल तसा दिक्काल ओलांडुन.

घेतां आचमुनी पवित्र जहरी ही रक्तगंगा लव,
विश्वाचे अभिषिक्त देव तरुनी होतील ते—*मानव*.

.१२.

जा जाई आतां, परतुनि कां हाससी ?
कां उगाच वळवुनि मागें
आपुली नजर, भारिसी ?

स्थितधी न जरी मी, मानी तरि मानिनी,
नच अवाक्षराही एका
काढीन कधीं भाषणीं.

ये वीणारव मधु, मंजुळ पवनांतुनी,
डबडबती ऐकुनि डोळे
कारुण्य-सुधा-सिंचनीं.

परि एकहि भोळा अश्रू जो तेथुनी,
पडणार तोंच घेईल
हृदयाग्नि तया शोषुनी.

धगधगित निखारा हृदयीं हा कोंडुनी,
मत्प्रसन्नवदनीं छाया
वरि शीतल चंद्राहुनी.

ही पाझरते तव शांत शरच्चंद्रिका !
निशिगंध दरवळे भोंतीं,
पुलकिता मार्ग-वालुका.

अदृश्य अप्सरा अवनीवर येउनी,
घुमविती निशा-संगीत
या मिटल्या पुष्पांतुनी.

मी मानव!—दुर्बळ!—दिव्य, धवल माधुरी!
व्याकळून हृदयीं येतां
स्मृति होइल तव अंतरीं.

हृत्कंप!—तरल भावना! गोड ती स्मृती!
परि निष्ठुर जरबेनें मी
गाडीन गाढ विस्मृतीं.

बंबाळ जखम आंतली दावतों अशी,
बेहिम्मत आर्तरवानें
रडतील रडो दिनशीं

निष्प्रेम-निराशा-दुःसह जीवन तरी,
याचना न केविलवाणी
मम वदेल कधिं वैखरी.

.१३.

झाली चूक!—क्षमस्व! वेड असलें जन्मांतुनी लागतें,
—तेंही एकच वेळ! नेत्र उघडे ठेवून ना दोनदां :
मौर्ख्याचा जगणें कलंक न असा लावून घेतां कदा,
सर्वांनाच कुठें शहाणपण हें देवाघरीं लाभतें!
ज्यांना संकट, दुःख, भीति अथवा चिंता, निराशाच ना,
ज्यांचे खोल न जीवनानुभव गे, ज्यां भावना वावडी,
टक्के वा नच टोणपे पचविले,—प्रज्ञा तयांची बडी!!—
त्यांनीं योग्यच हासणें, हिणविणें, संतप्त कष्टी जनां.
बेमालूमपणें बनावट अशा नाण्यांतुनी संपदा
घ्यावी साठवुनी अचूक!—शिकलों नाहीं परी ही कला.
घामानें भरलें कपाळ,—सुकली ही जीभ!—शोधी जला
आशेनें, हलु ओठ लागति जरी शेवाळल्या फत्तरा!

प्रीतीची नच आंच!—सावधपणें सांभाळणें कातडी,
सर्वांनाच अशी करामत कुठें!—जाती जळूनी मढीं.

.१४.

आलों—स्वतंत्र तव भाव !—स्वतंत्रतेनें
आराधण्या प्रथम तन्मय आर्जवानें,
प्रेमार्तता उघड बोलुनि दाखवीली
—शब्दांत, जे ठरति बालिश अन्य वेळीं.
दोघेंच आपण सुहास, न पाहणारा,
निश्चिंत-चित्त बघ मांडुनि हा पसारा
विश्वासपूर्ण बसलों मम भावनांचा,
रागानुराग नि विनोदमय स्तुतीचा.
किंचित् क्षणांत वरतीं तव दृष्टि जावी,
अन् हासरी चमक लोचनिं वेड लावी ?
होतें निवांत; मन संशयशून्य, भोळें;
अर्थाविना सरस-वाक्पटुताहि बोळे.
किंचित् पुन्हां नजर ही वरतीं करून,
तूं हासतां बघितलें फिरवून मान,
—भांबावलों—स्तिमित—बावरलों—कळेना
कोठें, कसा, कुठुनि मी.........

तों विश्वनाटकगृहांतुन या दिगंत,
हास्य-ध्वनी दुमदुमून भरे हवेंत;
अन् रंगभूमिवरला जगतांत खास
गेलों विदूषक पुरा ठरुनी सुहास !

.१५.

गेलों विदूषक जरी ठरुनी सुहास,
दान्ते-नि-शेक्सपिअर-संगत आसपास
कोठें तरी स्वमरणोत्तर भाग्यकालीं—!
हाही विचार न कमी मज शांतिदायी.

.१६.

जातेस तरि सुखानें। जा आपुल्याच ठाया;
हृदयांत साठलेलें। गेलें न रूप वाया.
ही एक मुग्ध कलिका। ताऱ्यास वेड लावी,
परि तत्प्रभात-अश्रू। हृदयीं दुजीच ठेवी.
आधार या तरूचा। वरतीं चढावयाला,
आलिंगणें लतेनें। स्नेहें वरी दुजाला.
ही रीत काय नाहीं। येथील कोमलांची,
अपवाद त्यास कैशी। होशील एक तूंची!

रेताड जीवनांत। भवितव्यता-किनारीं,
अति तीव्र वेदनांनीं। व्याकूळतां जिव्हारीं,
सौंदर्यरूप ईशा। भावें बघून हृदयीं,
मम पोळल्या जिवाला। लाभेल दिव्य शांती.

तारुण्य-रूप जातां। बघशील बावरून,
शांती अशांततेची। तूतें न तीहि जाण.

.१७.

मन वाचनिं आज ना रमे; स्मृति होते तव एकसारखी;
हुरहूर भरुन ये हृदीं; भर संध्या करि त्यांत आणखी.
बसलों म्हणुनीच येउनी—जग-कोलाहल लांब मागुती—
दगडावर त्याच, ज्यावरी गतकालीं तव स्निग्ध संगती.

पसरे लहरींत वायुच्या मधु छायार्णव सांध्य भोंवतीं;
निमिषांत नभावरी निळ्या किति नानाविध रंग फाकती.
अति संथ समीर-गारवा सुटुनी वाटसरांस सांगतो,
"जरि वाट कितीहि चाललां, नच आतां तरि अध्व-खेद तो."
विहरुन नभांत स्वैरसें घरट्याला निज शेवटीं त्वरें,
चिवचीवित सांज-माधुरी बघ हीं जात सुखांत पाखरें.
मिटणार फुलाफुलांतुनी, प्रतिपानावर कंप पावुनी,
लहरीलहरीतुनी जलीं, प्रति-मेघावर गोड रंगुनी,
श्रुतिशांत दिनांत-गीत ये श्रवणीं, "श्रांत जिवा विसाव घे!"
मज हाय कुठें न आसरा; करिती पारध हे विचार गे.
हळुवार सुहास, रात्र ही मखमाली पसरीत हात ये;
अपघात घडून देह हा पडला एक रुळावरी इथें.
बघुनी क्षण शांति मन्मनीं न कळे कां परि खास वाटली,
कुठुनी तरि शक्ति;.......................

.१८.

प्रीतीची दुनिया सुहास, हसते वाऱ्यावरी भाबडी;
स्वानंदें रमते समुत्सुक जनीं निर्हेतुका बापुडी;
अद्वैतांतिल मंजु गीत-रव तो आलापुनी गुंजनीं,
राही मग्न अशीच गोड अपुल्या स्वप्नांत रात्रंदिनीं.
आशांची बकुलावली विकसली मंदस्मितें भोवतीं;
ईषत्कंपितकल्पनाकिसलयीं निष्काम डोलेल ती!
चाखावा मकरंद त्यांतिल जरा; जावें, झुलावें जरा;
शंकाही नच कीं कधीं वठुनि हा जाईल गे मोगरा.
सौख्याभाव नि सौख्य एकच इथें संवेदनाजीवनीं;
नीती आणि अनीति संभ्रम फिटे स्नेहार्द्र संभावनीं;
संध्यादेवि उषेसह प्रगटते आकाल नीलांबरीं;
येई गे, अजरामरत्व मरुनी निर्वेध ताऱ्यांपरी.

नाहीं हें नशिबीं!—नसोच!—मिटती जागेपणीं पापण्या;
आई! येत म्हणून मस्तक तुझ्या अंकावरी ठेवण्या.

सचिंत पारध गोड तत्त्वतः
सोडुनि देतों अतां सुखानें !

सावज मागें, पुढें शिकारी !
गति-धुंदी ही भरे शरीरीं;
नसानसांतुन वेग चढे शिरीं;
वळुनी बघणें आतां कसलें !

पाय लागले डोंगर-माथां,
गतिमत्त्वानें एकतानता,
प्रभू-पावलें लांब तेजतां—
अंधुक, पारध तिथें संपणें !

.२०.

चंद्रकिरणांनो, तुम्हां
वाजते का कधीं थंडी
स्वतःची? मध्यरात्रीं
हिवाळ्यांत हुडहुडी!

नाहीं ना? मीं म्हणुनीच
लांबवलें मरणाला;
गारठून जाल जेव्हां—
चिता हवी शेगोटीला

# शिशिरागम

शिशिरर्तुच्या पुनरागमें,
एकेक पान गळावया
कां लागतां मज येतसे
न कळे उगाच रडावया.
पानांत जीं निजलीं इथें
इवलीं सुकोमल पाखरें,
जातील सांग अतां कुठें?
निष्पर्ण झाडिंत कापरें!

फुलली असेल तुझ्या परी,
बागेंतली वकुलावली;
वाळूंत निर्झर-बासरी;
किति गोड ऊब महीतलीं!
येतील हीं उडुनी तिथें,
इवलीं सुकोमल पाखरें,
पानांत जीं निजलीं इथें.
निष्पर्ण झाडिंत कापरें!
पुसतों सुहास, स्मरुनियां—
तुज आसवें, जरि लागलें
एकेक पान गळावया
शिशिरर्तुच्या पुनरागमें.

# कांहीं कविता

माझा अभंग माझी ओवी। नतद्रष्ट गाथा गोवी,
इंजिनावीण गाडी जेवीं। घरंगळे॥

कुठें ज्ञानेश्वर श्रेष्ठ। कुठें तुकाराम पवित्र,
कुठें समर्थ धीरोदात्त। संत सर्व॥

संत शब्दांचे नायक। संत अर्थांचे धुरंधर;
एक शब्दांचा किंकर। डफ्फर मी॥

ज्ञान-विज्ञानीं उमाळा। सत्ता मारी तिरूपा डोळा,
सोन्याचांदीचा सोहळा। आततायी॥

ऐशा टापूंत चौफेर। नाहीं माहेर-सासर;
कैचें गोत्र वा प्रवर। अनामिका॥

नेणें बिजली वा पणती। स्थिर आहे तरी दृष्टी;
आपद्धर्मे नाहीं कष्टी। बावळा मी॥

परि फाटे हें अंतर। आणि जन्मा येई अंबर!
तोंडा नाळ-अवडंबर। नारायणा॥

अहो शब्दराजे, ऐका। लाज सेवकाची राखा;
नाहीं तरी वरतीं काखा। आहेत ह्या॥

९.

प्रेमाचें लव्हाळें,
सौंदर्य नव्हाळें,
शोधूं ?
—आसपास
मुडद्यांची रास;
यंत्रांतून आग;
गोळ्यांचे पराग;
विमानांचे हल्ले,
बेचिराख जिल्हे;
रक्ताचीं थारोळीं;
अपंग आरोळी;
बेभानलें मन
रोखतां संगीन;
विटली ही काया.
देशावर माया
कुणाच्या ? कोणाची ?
पडत्या फळाची
आज्ञा होतां वीर
हातीं घेई शीर
कुणाचें ? कशाला ?
—भाकरी पोटाला ! !

आम्हां भाग्यवंतां
क्षमस्व अहंता;
आमुचें मरण
—आम्हीच जळण—

पाहिलें या डोळां !
विश्वंभर भोळा
सडवी पाचोळा
फुलविण्या ज्वाळा !

पृथ्वीची तिरडी
(एरव्हीं परडी
फुलांनीं भरली !)
जळो देवा, भली ! !

.२.

आरामाचा राम। वदावा निष्काम
खंदकांत पण। विसरावा॥

खंदकांत ओल्या। दारूगोळ्याचा रे
नाहीं नारायण। कदापीही॥

कोरडी ठेवावी। दारू सर्व काळ
ओठांवर माळ। हुकुमांची॥

पायाची वहाण। पायांत ठेवावी
चित्तीं असूं द्यावी। मद्यभ्रांती॥

अज्ञानी जनांस। ज्ञान पाजूं नये
मरूनी उरावें। धडरूपें॥

दे गा हेंचि दान। देवा, माझीं हाडें
खाउनी गिधाडें। तृप्त व्हावीं॥

.३.

जे न जन्मले वा मेले। त्यांसी म्हणे जो आपुले,
तोचि मुत्सद्दी जाणावा। देव तेथें ओळखावा॥

मोलें धाडी जो मराया। नाहीं आसूं आणि माया,
त्यासी नेता बनवावें। आम्हां मेंढरांस ठावें॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप
अनुक्रम २७५६० वि: ०५।८५
क्रमांक ११२१० नों: दि: ३।३।४

.४.

आग अंधाराची जीवा। कोण्या देवानें लावली !
गेल्या जन्मींचीं पातकें। फळा आलीं ॥

मंत्रजागर यंत्राचा। फोडी वाचा अंधाराला;
हंबरून गाय गेली। वासराला ॥

काष्ठ झालेल्या हो मनीं। जळीं, स्थळीं नि पाषाणीं,
सांगा पाहिला का कधीं। देव कुणीं ॥

सांगूं कोणां तत्त्वज्ञान। पान पान जाळी झालें;
गेल्या वर्षीच पोथींत। किडे व्याले ॥

केला उदंड विचार। आणि आहुतींची चर्चा;
आतां घ्यावी वैश्वानरा। पूजाअर्चा ॥

कोत्या मनांतलीं भूतें। हींच द्रोणांतलीं शितें;
मात्र ओशटलीं बोटें। आशाघृतें ॥

केली अंधारांत सेवा। नाहीं उमगला थाट;
परि आतां कृपावंता। द्या हो वाट ॥

उद्यां येईन माघारीं। उद्यां पाऊस-पाडवा;
आम्हां सज्जनांसी कैंचा। हेवादावा ! ॥

.५.

केला थोडा रोजगार। आणि अन्नाचा विचार;
आतां शेवटीं लाचार। माझा मीच॥

दृष्टी पडे जेथें जेथें। तेथें अंधत्वाचे काटे;
झालें ज्ञान उफराटें। कुंपण कीं।

हें का टेबल? ही खुर्ची?। नाकीं झोंबे ही का मिर्ची?
मग आभासाची बर्ची। मारिती कां?

आहें विज्ञान-महंत। आणि भावनेनें संत;
जन्ममृत्यूची ना खंत। टळे परि॥

आज पाहिलें मरण। गेला भांबावून प्राण;
माझ्या ज्ञानाचें कुंपण। स्मशानांत॥

लावा दुर्बिण आकाशीं। फोडा परमाणू-राशी;
आम्ही अधाशी? उपाशी?। आम्हां नेणें॥

जातां मायेची माउली। केली बापानें सावली;
आतां बहीण-बाइलीं। धीर दिला॥

हींहि जातील गा देवा। मग सर्वांचा सुगावा
कैसा कैसा रे लागावा। आंधळ्याला!॥

. ६.

आहे रक्तांत उजाळा । सूक्ष्मदर्शी चष्मा डोळां;
नाहीं बुद्धीचा पांगळा । मानव मी ॥

पंगू लंघे हिमगिरी । नाव चाले जलोदरीं;
जीव पैशाला पासरी । अणु-युगीं ॥

जयें केली ऐशी कृपा । नांव माधवाचें जपा,
म्हणा, 'तमहं वंदे' पां । ब्रह्मानंदा ॥

स्वार्थ बोले ओठींओठीं । सात्त्व बैसे पैशापाठीं; सत्ता
येरागबाळांच्या गाठीं । अर्धपोट ॥

फिर्‌वा फिर्‌वा रे दांडी । आणि मारा ही गचांडी,
'वंदे तमहम्' ब्रह्मांडीं । बरा नाद ॥

.७.

सकाळीं उठोनी । चहा-कॉफी ध्यावी,
तशीच गाठावी । वीज-गाडी ॥

दातीं तृण ध्यावें । 'हुजूर' म्हणून;
दुपारीं भोजन । हेंची सार्थ ॥

संध्याकाळ होतां । भूक लागे तरी,
पोरांबाळांवरी । ओकूं नये ॥

निद्रेच्या खोपटीं । काळजीचीं बिळें;
होणार वाटोळें । होईल तें ॥

कुणाच्या पायाचा । कांहीं असो गुण;
आपुली आपण । बिडी प्यावी ॥

जेथें निघे धूर । तेथें आहे अग्नी;
आम्ही जमदग्नी । प्रेतरूपीं ॥

.८.

कां हो माजवितां दुही । माखतां स्वातंत्र्याची वही
स्वजनरक्तानें प्रत्यहीं । लळथळां ॥

गातां धर्माचे पवाडे । उघडीं झालेलीं कवाडें
दाविती अब्रूचीं कीं हाडें । टांगलेलीं ॥

अरे हिंदू-मुसल्मान । प्राण देशावरी कुर्बान;
परी यादवी ही लांछन । अल्ला-रामा ॥

जो जो उठे तो तो नेता । मारी लंब्याचवड्या बाता;
परि हुल्लडीचा नियंता । कोणी नाहीं ॥

शद्बशूर वाचीवीर । ऐसे पुढारी थोर थोर,
जयीं प्रेतांचा बाजार । बोलवीला ॥

केला धर्माचा लिलाव । बुरखेवाली सत्ता-हाव,
येथें तुम्हां आम्हां राव । मात्र मौत ॥

जे जे म्हणविती पुढारी । वेळ येतां देती तुरी;
सुरा पाठींत, छर्रा उरीं । तुम्हां आम्हां ॥

बोला अल्ला है राम । करा पैगंबरा प्रणाम;
आहे तुम्हां आम्हां हराम । बंधुद्वेष ॥

कुठें गया, कुठें मक्का । हत्याकांड येथें फुका;
भुकेकंगालिस्तान का । झिंदाबाद ? ॥

.९.

मस्तली इच्छेची काया । ईर्ष्या, अहंता, असूया
बोचती, जैशा कीं सुया । इंजेक्शनीं ॥

इंजेक्शनें वाढे शक्ती । इंजेक्शनें जाई भीती;
इंजेक्शनें लठ्ठ होती । बुद्धि-स्नायू ॥

इंजेक्शनें पैसा मिळे । आणि पारंब्या तैशीं मुळें
रोगी-डाक्तरांचींही कुळें । पोसतात ॥

झाली इच्छा ऐशी पुष्ट । आतां ओढवे अरिष्ट;
कैसें निवडावें इष्ट । उद्दिष्ट तें ॥

अंधारलें अंतर्याम । दिला जेव्हां क्लोरोफार्म;
शक्ति असूनिही वर्म । निपचित ॥

अंगीं कुडतें-धोतर । आणि डोक्यावरी छप्पर,
भिंतीपल्याड वापर । डाक्तरांचा ॥

संज्ञा पावे अंतर्धान । मंत्रावीण चाले यज्ञ;
सगळे धन्वंतरी प्राज्ञ । मीच रोगी ! ॥

## .१०.

दोन खोल्यांच्या बिऱ्हाडीं । माझ्या घरीं मी ऱ्हाडी;
किंवा सासरीं कऱ्हाडी । जामात कीं ॥

कष्ट होतां चढे पारा । नाहीं किनीन उतारा;
अंगा झोंबे खारा वारा । अदृश्याचा ॥

येतां देवळाचा लांबुनी । घंटानाद जाई आंबुनी;
त्या घेतां भावना-भाजनीं । अश्रु फाटे ॥

किडलीं काळोखाचीं फळें । रात्रपाळी यंत्रांमुळें;
चाखतां भाव-यकृत् पिगळे । विषम-ज्वरें ॥

रात्र-पापणीचे केस । तेच तारा-रश्मि-वेष;
परि निद्रेचें साहस । करवेना ! ॥

.११.

आहे बुद्धीशीं इमान । जाणें विज्ञानची ज्ञान;
परि कोठें तरी आन । ताण पडे ॥

जाणें भांडवली वृत्ती । नष्टचर्य पिकवी चित्तीं;
आणि कामगारां हातीं । करवंटीच ॥

जाणें शुद्ध शुचिर्भूत । एक प्रायोगिक सत्य,
जरी त्याचेंच अपत्य । हिरोशिमा ॥

येथ शब्द नाहीं विज्ञाना । हें अवघें मानव्याविना,
नरमेध वाटे नरांना । धन्य जेथें ॥

जाणें आसक्ती-विरक्ती । स्वार्थ-परमार्थाच्या पंक्ती,
स्वच्छंदता आणि सक्ती । मिथ्या भाषा ॥

जाणें हें सर्व सर्व सर्व । नुरे जाणण्याचाही गर्व;
मतामतांचे निखर्व । मोजिले म्यां ॥

आली बेरीज शून्याची । उणें चाड अन्यायाची,
भागा वाण माणुसकीची । गुणा दंभें ॥

सांगा सांगा हो, उत्तर । अजुनी ना शून्याकार;
मग लावा अट्केपार । चीड-झेंडे ॥

## .१२.

नाहीं कोणी का कुणाचा । बाप-लेक, मामा-भाचा,
मग अर्थ काय बेंबीचा । विश्वचक्रीं ? ॥

आई गोंजारते मुला । कासया हा बाप-लळा,
बाईलप्रीतीच्याही कळा । कशास्तव ? ॥

येतें ऊर कां भरून । जाती आंतडीं तुटून,
कुणी कुणाचा लागून । नाहीं जर ? ॥

कैसा बांधला देखावा । जननमरणांतून देवा,
कुशीकुशींत गिलावा । रक्तमांसीं ? ॥

का हें बांधकाम सुंदर । फक्त नश्वरतेचेंच मखर
अथवा दर्शनी महाद्वार । मिथ्यत्वाचें ? ॥

मग कोठें रे इमारत । जिचें शिल्पकाम अद्‌भुत,
जींत चिरंतनाचा पूत । वावरे कीं ? ॥

जरी कुठें ऐसें धाम । ज्याच्या पायऱ्याही अनुपम
आणि चुना-विटा परम । चिरस्थायी ॥

तरी मग रोकडा सवाल : । 'कोरिसी हाडांचा महाल,
ठेविशी त्यांत हरिचा लाल । नाशवंत ॥

वास्तुशास्त्र कां बिलोरी । योजिशी येथेंच मुरारी,
घडसी वस्तीला भाडेकरी । बिलोरीच ?' ॥

## .१३.

केलें जन्मापासूनि रान । आपुल्या जिवाचें जाणुन,
वाटलें कीं काळोखांतून । येशील तूं ॥

नाहीं उठलों जगांतून । उबविलीं अंडीं ना बसून,
म्हणुनी ब्रह्मांडीं का रुसून । बैसलास ॥

झाली ताटातूट कैशी । केव्हां आणि कोठें, मजसी
कांहींच नुरलें स्मृतिशेषीं । कृपावंता ॥

मात्र जैसें कीं पाखरां । झाडावरून येतां वारा,
मज अज्ञाताचा फवारा । बिलगे तसा ॥

मग उडती शब्द-पिसें । हृत्पंखांतले जे ससे,
ज्यां ज्ञात गोफणीसरसें । खालीं आणी ॥

ज्ञाताज्ञाताची काचणी । सर्व बोलती कीं ही फणी;
इथें संज्ञाशक्ति का कुणी । विंचरावी ! ॥

माझ्या अंतरीं अपाप । दाटते काळोखाची वाफ,
जियें हाक-शिट्टी साफ । किंचाळते ॥

कळ लागते गा येथेंही । बाष्पीभूत संज्ञा पाही,
काळोखांतून काळोखीं । जाण्याहि ये ! ॥

.१४.

चालला हा बंदिवान । गाडा हाकी गाडिवान;
कुणी सूटबूटीं ज्वान । अधिकारी ॥

शुभ्र खादीबंद शेट । जया हिंसाधर्म-वीट,
युद्ध-साहित्य-कंत्राट । घेण्या उभा ॥

नील गणवेषीं हा खडी । गस्त घाली ‘ पीली पगडी ’;
वणिग् सहजगत्या वाकडी । दांडी मारी ॥

काळा कोट, काळा टाय । त्याचा कोर्टाकडे पाय;
बारावंदींत घेई ‘ चाय ’ । खेडूत हा ॥

यंत्रा तेल मेकॅनिक । देत मळक्या वस्त्रीं एक;
अंगणीं काढी स्वस्तिक । रूपलेखा ॥

तलम पारदर्शी वसनीं । ढेरपोट्या दे ताणुनी;
आंधळा लक्तराभरणीं । चाचपडे ॥

ऐसे इतरही अगण्य । ज्यांचें मिळून जीवारण्य,
देई विश्वदर्शनाचें पुण्य । चिन्हमात्रें ॥

सर्व वदनांवरी धूर । पहा त्यांतून खेळे नूर
वैवस्वती, जैसा सूर । आट्यापाट्या ॥

माझी आर्तते फिर्याद । कैशी यमाची अवलाद
दिसेल ही होतां बाद । पाटीवर ! ॥

.१५.

जगाचा लिप्ताळा । नाहीं, किंवा भोळा;
तुझ्या परिमळा । मुकलों पैं ॥

एकला असून । मनीं दोन झालों,
आतां मात्र भ्यालों । मला मीच ॥

नाहीं मी उदास । विपन्न, विरक्त;
नाहीं तैसा भक्त । ऐहिकाचा ॥

माथां केव्हां गोणी । वाचीं कधीं नास;
देऊळ, गुदाम । दोन्ही भाग्यीं ॥

कितीक दालनें । धुंडाळीत आलों;
उत्कंठा ही ल्यालों । स्वप्नांतली ॥

आशेचीच वात । आशेचेंच तूप;
जळतें स्वरूप । निराशेचें ॥

चिंतेवीण चिंता । आशेवीण आशा,
साद्यंत तमाशा । रंगवीन ॥

येईल पडदा । हळूहळू खालीं;
विदूषका वाली । हास्यरस ! ॥

.१६.

शिवलिंग माझें लिंग । हेंच अशांतीचें बिंग,
ज्यांच्या झुंजें संज्ञारिंग । व्यापिलें गा ॥

दोन्ही खवीस खमंग । एक अंगांतला अनंग,
दुजा निर्गुणाचा ढंग । झटपटीं ॥

एका शब्दाचा आधार । दुजा शरीरांत तर्र,
मध्यें लुंगासुंगा फकीर । मीच मात्र ॥

एक मांडी 'काल'-बाजार । दुजा 'उद्यां' दे उधार,
माझा 'आज'चा व्यापार । अगतिक ॥

जैसे विमानाचे पंख । फडफडल्याविनाही डंख
मारितां हवेस, शंख । हवा करी ॥

तैसें ज्ञान आणि वासना । दृश्य प्रदर्शनाविना
दंश करितां मन्मना । ओरडे तें ॥

वासनेंतून व्हावें ज्ञान । ब्रह्मज्ञानीं विषयसेवन;
का मिथ्या जगीं मिथ्या भान । अशांतीचें ? ॥

चालणें ही अशीच । मर्त्यांश-अमर्त्यांश-खेंच,
जो जिवंत सृष्टीचा पेंच । तोच पाया ! ॥

.१७.

जे अज्ञानांत जन्मले । आणि अज्ञानांत मेले,
त्यांस देवा तूं धरिलें । काय पोटीं ? ॥

का, झालासी निष्ठुर ? । दिलें तयांसी अंतर
जन्ममरणाही नंतर । विश्वगर्भीं ॥

देहसाफल्य पावलें । पृथ्वीवरी त्यांचें भलें;
आलें काम त्यांनीं केलें । आणि गेले ॥

गळे अश्रूंवीण चरबी । तीच अज्ञानाची छबी;
झाले ते खत आणि बीं । तुझ्या मळां ॥

आम्ही ज्ञानवंत भागलों । ना पश्चात्तापें पोळलों;
नाहीं कधीं हळहळलों । परदुःखें ॥

वेचिलें ज्ञान कण कण । जैसे कीं वाळुका-गण;
झालों कोरडे पाषाण । बुद्धिरूपी ॥

आमुची संज्ञा ही दरड । रखरखीत देहापाड,
वरी अहंतेचा पहाड । लागलासे ॥

होतां तप्त ही जमीन । नाहीं अश्रू, नाहीं घाम;
वांझपोटीस इनाम । रूक्ष काया ! ॥

.१८.

फिरतां पिसाट पिसाट । अंतरिक्षीं या अफाट
ग्रहमालेचें चऱ्हाट । सूर्य फेकी ॥

अवकाशीं पडे पीळ । गाठीगाठींत घननीळ,
जमती आसावरी रीळ । जडत्वाचे ॥

उकलाया सूत्रबद्ध गाठी । आमुच्या बुद्धीसी वेठी
कासया धरिलेंस जगजेठी । सर्वसाक्षी ॥

जरी आत्मविश्वास आम्हां । आणि सत्याचाही पान्हा,
तरी ढोरांचाच कान्हा । शेवटीं तूं ! ॥

बडवीत टिर्‍यां । अर्धपोट किंवा
ओंगळ देखावा । दाखवीत ॥

भिक्षा मागे रोज । एवढासा पोर,
आई ती लाचार । पाठीमागें ॥

शेठ सावकार । मीही शरमिंदा
मानव्य-मिलिंदा । पैसा देतों ॥

होउनिया नंगे । पोटा घास घ्यावा,
आम्हीही तो द्यावा । हलाखी ही ॥

सत्याचें सुपीक । विश्वांतून वेचूं,
प्रयोगांत खेचूं । परमाणू ॥

अधिकार ऐसा । मिळविला आम्ही;
आमुच्याच धामीं । नाठाळ कां ! ॥

सत्तेचेंच तूप । सत्तेचीच पोळी,
मानव्याची होळी । भाजाया ती ॥

देवा, ऐशी भूक । कासया दिलीस ?
झालों कासावीस । मीही नंगा ॥

नंग्यांचाच आतां । येथें कारभार
कोंडी आरपार । फोडाया ही ॥

टिर्‍यां अर्धपोट । जोंवरि आहेत,
ओंगळ समस्त । आम्ही नंगे ! ॥

२०.

शुभ्र-तिमिर-मोहक-वसना । मर्मर-रव-चर्चित-नयना
संथ तरल येई रजनी । विश्वांतुन जपुनी जपुनी;
मंद मंद ज्योतिःकणही । खोवुनिया मुकुटीं पाही,
पापणींत टिपुनी घेई । क्षण-कणिका ओल्या कांहीं;
सावरीत कचभारातें । वेचित ये मंगल हातें
जीवांचे हलके झेले । जागृतांत अंथरलेले.
सुन्न इथें झाली इवली । फुलमाया विश्वामधली;
जगतांना थोडी थकली । चांदण्यांत थोडी हसली,
स्वप्नाविण आतां निजली । शीर्णपर्ण वैभवशाली;
रोमरंध्र शिणुनी गेले । अलवालीं शैवल थिजलें.
उमलतील कलिका दुसऱ्या । खेळतील निर्भय टिपऱ्या;
सांगतील झाली जागी । फुलमाया अन्य, अभागी !

जगण्याचा असला सवदा । मरणांतच काढी कशिदा;
श्वासाला एकच ऐट । किनखापी रजनी-भेट !

.२१.

दा. क्र. १०६०७...
(स्थळ प्रत)

पिपांत मेले ओल्या उंदिर;
माना पडल्या, मुरगळल्याविण;
ओठावरती ओठ मिळाले;
माना पडल्या, आसक्तीविण.
गरिब बिचारे बिळांत जगले,
पिपांत मेले उचकी देउन;
दिवस सांडला घाऱ्या डोळीं
गात्रलिंग अन् धुवून घेउन.

जगायची पण सक्ती आहे;
मरायची पण सक्ती आहे.

उदासतेला जहरी डोळे,
काचेचे पण;
मधाळ पोळें
ओठांवरती जमलें तेंही
बेकलाइटी, बेकलाइटी !
ओठांवरती ओठ लागले;
पिपांत उंदिर न्हाले ! न्हाले !

२२.

आळसली बघ जिवंतता ती
या वृद्धेच्या वदनावरती;
अन् सलते ही माझ्या चित्तीं
'आज-काल'ची जणुं चिनिमाती.

होतें आभाळ पंगत,
सूर्यगोल रेंगाळला;
जैसा इच्छेच्या गल्लींत
श्वान आशेचा भुकेला.

कुणी ओरडलें कोठें
'—बाई, भिकाऱ्याला घाला';
जैसा सत्याच्या निशेंत
ब्रह्मचारी करी चाळा.

सूर्य धावला अंधारीं,
जाग आली आभाळाला;
कुणी कुठल्याशा दारीं
उष्ट्या महाग अन्नाला !

.२४.

*“पोपटपंची चतुर्कि जान्
पढो पार्वती शिरि भगवान्.”*

होतां होतां राहुन गेले
तारुण्यांतिल दाणे मोती;
जगतां जगतां मरून गेले
बागुलबोवे शेतावरती.

*“पोपटपंची चतुर्कि जान्
पढो पार्वती शिरि भगवान्.”*

वडारणीच्या मुलें लागलीं
पाठंगुळीला दिवसाढवळ्या;
खुज्या मनांतिल रूळावरती
वळवळती कृमि आणिक आळ्या.

*“पोपटपंची चतुर्कि जान्
पढो पार्वती शिरि भगवान्.”*

उंबरठ्यावर पिवळा हत्ती
भरला चिंध्यांनीं अलबेला;
पिंगटलेले सताड भोंदू
त्यास दाविती दोंद-तबेला.

*“पोपटपंची चतुर्कि जान्
पढो पार्वती शिरि भगवान्.”*

वडारणीचा बागुलबोवा
जुळवित बसला पिंगट हत्ती;
येतां येतां ठिपकत आळ्या
रचीत बसल्या दोंद-प्रशस्ति.

*“पोपटपंची चतुर्कि जान्*
*पडो पार्वती शिरि भगवान्.”*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 24440 दि: 3/64
क्रमांक 2282 नों: दि: 3.1.3.

.२५.

रखड रखड रखड जरी फाटते तुमान
ठिगळाविण वसन इथें नच नभासमान ॥ ध्रु ॥

स्नायूंचा पीळ तुटे;
घामाचें पेव फुटे;
फुरसत नच लाज तरी वाटण्या जबान ॥

पोटांतिल स्निग्ध भाव
नैसर्गिक ज्यां न वाव,
वितळतील विष्ठेमधिं; आपणा तमा न ॥

मरणाची कळ न फार;
तंग असे जरि विजार
शब्दांची आशयास, राख तरि इमान ॥

.२६.

काळ मारुनी गेला टपली
न कळत;
        डोक्यावरती तुळई
उदात्ततेची खुद्कन् हसली,
जणुं दरियामधिं धोका-समई.
विचार देई दीर्घ जांभई,
आग्गाडीमधिं जैसें अर्भक;
खुद्कन् हसली उदात्त तुळई
पाहुनिया तुळतुळीत मस्तक.
        केसामागुन केस गळाले;
        खाजवुनी का जातें टक्कल !
        जीवामागुन जीव चालले;
        तिळतिळ तुटुनिहि येइ न अक्कल !

.२७.

पोरसवदा होतीस
कालपरवांपावेतों;
होता पायांतही वारा
कालपरवांपावेतों.

आज टपोरलें पोट,
जैसी मोगरीची कळी;
पडे कुशींतून पायीं
छोट्या जीवाची साखळी.

पोरसवदा होतीस
कालपरवांपावेतों;
थांब उद्यांचे माउली,
तीर्थ पायांचें घेईतों.

.२८.

त्रुटित जीवनीं सुटी कल्पना,
टिंग् टिंग् जैसा खोटा नंबर;
सलग जमेना एक भावना,
'हलो हलो'ला हलकट उत्तर.

सभोवतालीं घरघर चाले,
वरवर आशा जगण्याचीही;
कुणी न मरती मात्र येथले;

ट्रिंगल अमुची करितो यमही
यम् यम् पश्यसि त्याचा फासा
जुळवुन देइल खोटा नंबर :

ब्रुवन्ति सारे—घे कानोसा :
'मरणारांचें जगणें खंबिर !'

बाळगुनी हा पोटीं इवला
गोळा, हसशी प्रसन्नतेनें;
साकारुनि दे निराकृतीला
विरूपता तव तन्मयतेनें.

रसद्रव्यांचे ओढे-नाले
तव रक्ताच्या गंगेलागीं
कितीक मिळती झुळझुळ, इवले
अवयव उगवित इवल्या अंगीं.

अशीच हससिल ‘सुटका’ होतां;
प्रसन्नता मग जरा निराळी;
रसद्रव्यांचे ओढे-नाले
वळणें घेतिल जरा वेगळीं !

.३०.

पळापळांतिल जोर मनगटीं
घेउन तोडी स्मृती पाकळ्या;
जळाजळांतिल पीळ उकलतां
तळ्यांत दिसती किती सावल्या.

मिटल्या नयनीं स्वर्गहि बहरे :
अजाणत्याची निर्भय होडी !
फसला मासा पहात राही
प्रतिबिंबांचीं अनंत कोडीं !

पाकळ्यांतला साखळदंड
जखडुन टाकी आनंदाला;
प्रतिबिंबांतिल लवचिक सृष्टी
घेरुन घेई प्रतिष्ठिताला !

.३१.

*फलाटदादा, फलाटदादा,*
*येते गाडी, जाते गाडी;*
*फलाटदादा, आली ही—*
*पण*
*शिंगल पडला, गेली गाडी !*

हिम्मत तुमची खरी पहाडी,
फलाटदादा, फलाटदादा;
कितीक गेला गडी तुडवुनी
छातीवरती तुमांस समदा !

*फलाटदादा, फलाटदादा,*
*येते गाडी, जाते गाडी;*
*फलाटदादा, आली ही—*
*पण*
*शिंगल पडला, गेली गाडी !*

फलाटदादा, इंजनवाली
पसंद पहिली भपकेदार ?
का आतां ही विलेक्ट्रिकीची
नक्टी नागिण तळख-तार ?
किति पायांची छोट्या मोठ्या
मऊ चामडी गेलां हुंगुन;
किती बुटांच्या ठोकर टांचा
फलाटदादा, गेलां पचवुन !

सपाट, नाजुक, नखरेबाज
बिलगुन गेल्या किती चंपल्या;
किती रांगडी ठसकेदार
वहाण गेली दावित टिकल्या !

*फलाटदादा, बोला वो तुमि !*
*आली गाडी, गेली गाडी;*
*परी न हसलां, अथवा रडलां,*
*रामरामचा फुफाट हर्‌घडी !*

किती बावटेवाले दादा
मुछीदार अन् मुछीबगर बी;
हमाल-पोर्टर निळेतांबडे
तुमी पाहिले हजर्‌जबाबी !
पचक् पान ह्यो कुनी थुंकले;
कुनि मायेचे निरोप दिधले;
बिडि-माचिस् कुनि इकीत फिरले;
विलायती कुनि मुके घेतले !
हर् गार्डाची न्यारी शिट्टी;
हर् ड्रायव्हर्‌चा न्यारा हात;
तुमांस दादा, ठाउक आहे
पर् समद्यांची बारिक बात !

*बोला वो तुमि, बोला वो तुमि,*
*फलाटदादा, आली गाडी;*
*उरांत गुपितें कितीक तुमच्या !*
*बोला वो तुमि !*
*गेली गाडी :*

किति तोऱ्यानें ऐटबाज अन्
दिमाख दावित, घेत सलामी,
'थ्रू' गाडी ही येई-जाई
झगाळ, जनुं की रानीवानी !
मनांत ठसली फलाटदादा,
झोकदार ही पल्लेवाली ?
फटाकडी वा 'लोकल' गाडी
चटक्चांदणी थिल्लर पटली ?
लटांबराची गबाळ संथ
मालगाडि का बोलघेवडी
बरी वाटली ऐसपैसशी,
घरलक्ष्मि जनु यडीभाबडी ?

*फलाटदादा, बोला, बोला !*
*मिस्किल शिंगल हिरवा झाला;*
*गेली गाडी :*
*फलाटदादा,*
*आतां तरि वो बोला, बोला !*

मिस्किल शिंगल, भोळा सांधा;
सीधे रूळ नि खडी गोमटी;
कुरूप काळी पाठ लावतां,
ज्या जीवाला धरिलें पोटीं,
ह्या समद्यांच्या गोष्टी सांगा;
फलाटदादा, आली गाडी;
बोला वो तुम्हि ! पाठ टेकतों.
शिंगल पडला :
गेली गाडी.

*फ्लाटदादा,*
*फ्लाटदादा,*
*बोला वो तुमि;*
*गेली गाडी :*
*बोला वो तुमि !*
*फ्लाटदादा,*
*फ्लाटदादा... !*

.३३.

*पचगव्य-शर अखिल जगाचे.*

दात विचकुनी गेली रात्र;
सूर्य पहातो जरा चकाणा;
मच्छरदाणीवरी बांधुनी
छप्पर गेला कोण शहाणा !

उजाडतांना झाड थांबलें
चालायाचें अचानकच कां ?
दोन पाय हा असून बेटा
सरळ चालतो, मौज नव्हे का !

दावितात हीं कुणा धुराडीं
तिरपी घालुनि टोपी, वचका ?
कुठल्या, कोणी, कुणास दिधल्या
सांजवातिला आणाभाका !

जरा पिळावें अंबुस अंग;
पिळोख्यांतुनी गळेल शीण;
उंच-सखल ही जमीन, पाय
जरा पाहुनी ठेवावा पण.

रित्या मनांतिल भकासतेला
होतें चिल्खत वीज-दिव्यांचें;
तेंही गेलें म्हणून का हे
पंचशव्यगर खजिल अगाचे !

.३२.

धवल धुक्याच्या संथ वटांची
त्यालीं मल्मल किती घरें हीं;
अहंपणाच्या उद्दामाची
व्यालीं दल्दल किती मनें हीं !

लाज घराची गवंड्यास ना;
इमारतींचा ईश्वर वाली !
लाज मनाची ईश्वरास ना;
दल्दल राखी फक्त मवाली !

धुक्यांत मल्मल काळी व्याले
किती मवाली इमलेवाले.

*पचगव्य-शर अखिल जगाचे.*

दात विचकुनी गेली रात्र;
सूर्य पहातो जरा चकाणा;
मच्छरदाणीवरी बांधुनी
छप्पर गेला कोण शहाणा !

उजाडतांना झाड थांबलें
चालायाचें अचानकच कां ?
दोन पाय हा असून बेटा
सरळ चालतो, मौज नव्हे का !

दावितात हीं कुणा धुराडीं
तिरपी घालुनि टोपी, वचका ?
कुठल्या, कोणी, कुणास दिधल्या
सांजवातिला आणाभाका !

जरा पिळावें अंबुस अंग;
पिळोख्यांतुनी गळेल शीण;
उंच-सखल ही जमीन, पाय
जरा पाहुनी ठेवावा पण.

रित्या मनांतिल भकासतेला
होतें चिल्खत वीज-दिव्यांचें;
तेंही गेलें म्हणून का हे
पंचशव्यगर खजिल अगाचे !

.३४.

सुखदुःखांचे गळे कापुनी
मळे पिकविले वर्षांनीं तरि,
रवंथ काढी कुढ्या मनाची
जुनाच भाकड-कडबा हा वरि.

कुडीकुडींतिल भाव लाळला;
आचळ धरिती पातळ आशा;
अधू मनाची दुडकी कुठवर—
जमेल तर ही जिथवर भाषा,

—आणि पांगल्या गाई जगभर;
गोमूत्रानें पावन अंबर !

.३५.

देवळांतल्या ऊद हुंगतो
गाभा भरुनी काळोखाला.
मढींत काजळ धरतो कंदिल,
आणिक कुबड्या एकांताला.

खुल्या दिलाची कंबख्ताच्या
मढ्यांत काजळ धरे भावना;
शततारांचा पुंज शोधतो
एक मनोरा हवेंतिल पुन्हा.

जाइल सळई तुझ्या कृपेची
बुब्बुळलेल्या खाचांतुनि जर,
शततारांचा पुंज हवेंतुन
खेळवीन या तळहातावर !

काळ्या बंबाळ अंधारीं
धपापतें हें इंजिन;
कुट्ट पिवळ्या पहाटीं
आरवतो दैनंदिन
भोंगा.—
*“घनःश्यामसुंदरा श्रीधरा गिरिणोदय झाला,*
*उठि लवकरि दिनपाळी........”*
—गोंगाटला सारा
कामगारवृंद आणि
कोंबटशा पिळी धारा
यंत्रावर चक्रपाणि
घामाघूम.—
*“कुत्रापि पतितं तोयं यथा गच्छति सागरम्*
*सर्वचक्रभ्रमस्कारं मालकं प्रति गच्छति.”*
—काळें पुच्छ
लपवुनी पायीं, गर्द
इथें वस्तींत गलिच्छ
भों भों भुंके लालजर्द
संध्याकाळ.
*“शुभं करोति कल्याणं दारिद्यं ऋण-संपही*
*शुद्धबुद्धिविनाशाय भोंगाकुत्री नमोऽस्तु ते.”*

.३७.

कणा मोडला निश्चलतेचा
ह्या पालीच्या आवाजानें;
'धम्मं सरणम्' कुणी बोललें
पाषाणांतिल बुद्ध-मिषानें.

सरणावरती सरण लागलें
जिवंत आशा पडे उताणी;
गया गोपिचा उतरे राजा,
'सुटला', म्हणती सारे, 'प्राणी'!

.३८.

शब्द टराटर् फाडुनि टाकी
सांगायाचें म्हणजे ओठीं
तसेंच राहिल माझ्या अगदीं—
पूर्ण नागडें, पूर्ण नागडें !

.३९.

तुझ्याच आलों डोळ्यांदेखत;
असाच पडलों येथें खितपत;
जन्माचें जें माझें घेणें,
वसूल होइल केव्हां, कितपत!

*“ देवाजीनें करुणा केली,*
*भातें पिकुनी पिवळीं झालीं.”*

देवाजीनें करुणा केली,
सकाळ नित्याची ही आली
जणुं पायानें चित्त्याच्या अन्
रस्ता झाडी झाडूवाली.

घराघरांतिल चूल पेटली;
चहा उकळुनी काळा झाला;
जरा चढवितां दुसरें भांडें,
भातहि शिजुनी होइल पिवळा.

देवाजीनें करुणा केली :
रोजचीच पण ‘बस’ही आली
जणुं पायानें हरिणीच्या अन्
शिरस्त्यांतलीं कामें झालीं.

घरीं परततां, भाजीवाली
समोर दिसली, भरली थैली;
दो दिडक्यांचीं कडू दोडकीं
जरी पिकूनी झालीं पिवळीं.

उजाडतां जें उजाड झालें,
झोंपीं गेलें मावळतां तें :
करील जर का करुणा देव
बिचकुनि होतिल हिरवीं भातें !

विशाल पट्टे सतेल, तांबुस,
जरा सैल अन् मऊ, कातडी;
सिलिंडरावर गर्‌गर् फिरती
किति वेगानें !—जणूं सालडीं
काळाचीं, जीं प्रकाश कातित
गिरगिरती ह्या पृथ्वीभवतीं.

चकाकणारे अव्लख पिस्टन
हिस्के घेती मारित सिटक्या;
संज्ञेवाचुन संभोगाची
अशीच कसरत असते हलक्या.
मधेंच कोठें दर्शक-यंत्र
सुई मारतें अस्थिरतेची.

अवीट चक्रें बाहुपाश हे
दातांदातांतुनी गोवती;
पेरुवाणी, बोरांवाणी;
बटन दाबतां, उडून जाती
बल्ब नि ठिपके हिरवे-लाल,
फूलपाखरें जणूं इराणी !

पहा, पहा ही एकतानता
तांबट-पितळी सृष्टीची ह्या;
पोलादाच्या भव्य पहारी,
जरा न लवती ज्यांच्या भिवया !
यंत्रमुग्ध अन् होउनि लावा
महालांत या धूप नि समया !

.४२.

येशिल तेव्हां जपून ये तूं,
ठिसूळ माझ्या पहा बरगड्या;
आलिंगन तूं देतां मजला
कडकडुनी, ह्या पिचतिल निधड्या.

परंतु टाळूं नको यावया
ठिसूळ माझ्या म्हणुनि बरगड्या;
हृदयामधल्या हेतूंलागीं
हव्यात हाडांच्या ह्या तिरड्या !

राव, सांगतां देव कुणाला,
शहाजोग जो शहामृगासम;
बोंबिल तळलों सुके उन्हांत,
आणि होतसे हड्डी नरम.

छान शेकतें जगणें येथें
जगणारांच्या हें अंगाला;
निदान ढेकर करपट आणूं
द्या तुमच्या त्या शहामृगाला !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप
अनुक्रम २४६४० दि: ३।०५
क्रमांक ९४२४० नों: दि: ३।३

.४४.

तसूतसूंतुन आसूं निथळे
महान करुणा कोणाची ही ?
दिसादिसांचा कीस पाडुनी
कुणास विकतो कोण मिठाई ?

उपऱ्या वदनीं भिक्षांदेहि;
करुणेचें नच येथें सत्र :
हलवायाच्या घरावरी हें
असें ठेविलें तुलसीपत्र !

गोंधळलेल्या अन् चिंचोळया
गिरगावांतिल गल्लीमध्यें
चिमण्या अंधाराचें चाले
पुसट प्रबोधन—
*"उघडि नयन रम्य निशा पुसत पुसत आली,*
*अरुणवरणमय मलई मानि मांजर......"*
—खाईमध्यें
संसाराच्या, निबरट किरटीं
हाडबंडलें अशा बायका
उष्टींभांडीं उरकुन बसल्या
विणीत चिमणें जीवन—
*"डोळे हे फिल्मि गडे, खोकुनि मज पाहुं नका !*
*काढूं मी दळणा कशि, निवडुं सख्या, आणि मका !"*
—ऐका :
कुल्फीमलईवाला आला;
तसाच ढकलित चिगट बाटल्या
जास्वंदी अन् नारिंगी पण
—हाताळुनि ज्या काळ्या झाल्या—
सरबतवाला.—
*'अजुनि चालतोंचि वाट माल हा खपेना;*
*विश्रांति-स्तन कोठें घ्यायचा........."*
—गिरगावांत
गलबत काळोखाचें पेरी
नांगर चिमणा असाच अपुला.

दण्कट दंडस्नायु जैसे
लोखंडाचे वळले नाग;
कभिन्न काळ्या मांड्या, जैसा
पोलादाचा चिरला साग.

धगधगणाऱ्या भट्टीपुढल्या
प्रकाशांत ही तळपे कांति,
जशी ओलसर शिशवी-नक्षी
पॉलिशलेली चांदण्यांत ती.

टणक् कोळसा पवित्र्यांत हा
खोरुनि घेई पावड्यांत अन्
झोकुनि देई पहा लीलया
तसाच भट्टींत अचूक झर्‌कन्.

आणि फुरफुरे भट्टी जैसी
हले सावली-प्रकाश तैसा;
भालावरला रुमाल शुभ्र
जिरवुन घेई घाम जरासा.

यंत्रयुगांतिल नवनृत्याचा
स्थाणुभाव हा प्रगटे येथें;
मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक
संगमरवरी मांसामध्यें.

—अहा, कोळसेवाला काळा!
नव्या मनूंतिल गिरिधर-पुतळा!!

४७.

पिंचे अंधार पोकळ,
गहिवर येई काळा;
गालीं वाळला ओघळ,
दहिवर झालें गोळा.

तुझ्या भुरक्या केसांचे
वळ माझ्या गालावर;
माझ्या ढिल्याशा बोटांचे
तळ तुझ्या स्तनावर.

सोडवेना सोडवीतां
गेल्या रात्रींचा हा पाश
जागा आहें तरी आतां
मेल्या इच्छा सावकाश.

.४८.

ओहोटीच्या काठावर
वास येई खरपूस;
जैसा अर्भक-मेंदूंत
कच्च्या चिंचांचा पाऊस.

ओक्या लाटांवर एक
बुडे-उडे हें ओंडकें;
तारुण्याच्या कल्पनांत
जैसें बेतांचें पुडकें.

आणि घाबरला फेस
कवटाळी खडकाला;
जैशी मरणाची खात्री
म्हाताऱ्याच्या उत्साहाला.

—आम्हां मानवांची पुंगी
साद देते क्षितिजाला;
काढी सागराचा भंगी
घाण मात्र या काठाला !

.४९.

नाहीं शोधिलें गावाला,
नाहीं विचारलें नाव;
फक्त चालत रस्त्यानें
केला स्वतःचा लिलाव.

किती मनांतलीं पापें
केलीं रस्त्यांत गा देवा;
किती हासडल्या शिव्या
तुला, करुनी कांगावा.

पावसाळे आले गेले;
दोन युद्धं जमा झालीं;
रस्त्याकडां वीजबत्ती
कितीकदां आली गेली.

मनांतल्या पातकांचे
होती क्रिस्टल तयार;
आणि अजून शेलकी
आहे शिवी जीभेवर.

—हेंचि दान देगा देवा
गळूं नेदि नेदि जिव्हा !

उगीचच वेंधळी कोंबते
काळाच्या पिशवींत झावळ्या;
जिथें पिकावा नारळ तेथें
टोपलींत कुणि भरी मासळ्या.

गळ्यागळ्यांतुन सूर उसळतो,
उरांत लटके उलटें वाघुळ;
खळीखळींतुन हसतो गाल,
कवटिंत उगवे खुरटा बाभुळ.

परिस्थितीचें पिऊन ॲसिड
लिबलिबलीं हीं मनें हडकुळीं;
लागतील रे कधीं तरी का
यांवरही तव नारळ-बकुळी !

.५१.

फस्फसून येतो सोड्यावरती गार
हा तुषार-केसर फेस-गेंद अलवार;
हुंगीत तयाची खारट मादकता ही
कुणि करितो ओले ओठ इथें मध्यान्हीं;

घाशीत कंठतो काळ मनांतील खरडे
फुंकीत धुराचें एकलकोंडें कोडें;
तों हळूच येई रांगत फाल्गुन-वारा,
अन् गळती वेफर झाडावरुनि भरारा;

परि खिशांत जातां चवलीसाठीं हात
राहती मनांतील वेफर हाय मनांत!
—गुमींत इराणी स्वप्न पाहतो ऐसें
स्वप्नांतहि स्मरतो सोड्याचे पै-पैसे.

.५२.

—अशीच होती नकटी एक,
उलटे केस नि तिरप्या भिवया,
सुरक्त दावी उरोज उन्नत,
ढेपा जैशा तेल्याघरच्या.

काय हलाखी स्त्रीत्वाची ही;
माणुसकीचें काय विडंबन!
भोगशून्य करि भोगव्यथेचें
लिंग-गंड प्रच्छन्न प्रदर्शन!

.५३.

कुठें तरी केव्हां तरी
जातें असें हें चुकून;
आणि तवंगतो जीव
विना रंग, विना ऊन.

मग दिसे खरी घाण:
कारखान्यांतील तेल
आलें होऊनी निचरा
पाण्यावर टाकींतील.

तेल पाण्यांत जिरावें;
पाप बुडावें संज्ञेंत;
हें तों अशक्य अशक्य
विज्ञानाच्याही भाषेंत !

.५४.

किती वितींचें जीवन माझें
तुलाच ठावें, सदारंग तूं;
किती शितांची माझी भूक
ओरबाडते आंतिल किंतू.

होतें–आहे–होइल यांतुन
वीज वाहते होण्याचीच;
ह्या स्नायूंच्या तारांचा रे,
तुझ्याच हाताखालीं स्वीच.

पुरेल मजला स्थिर वाटोळ्या
तेजाचा बघ असा जरी क्षण,
मेल्याविण जैं जळतिल तारा,
तरारतिल अन् स्नायूंचे कण !

.५५.

बोंड कपाशीचें फुटे,
उले वेचतांना ऊर;
आज होईल का गोड
माझ्या हाताची भाकर !

भरे भुइमूग-दाणा,
उपटतां स्तन हाले;
आज येतील का मोड
माझ्या वालांना चांगले !

वांगीं झालीं काळीं-निळीं
काटा बोचे काढतांना;
आज होतील का खुशी
माणसं ग जेवतांना !

.५६.

हाडांचे सापळे हासती
झडणाऱ्या मांसास पाहुनी
किती लपविलें तरी शेवटीं
दातांचें दिसणारच पाणी.

पहा विचारुनि त्यांना कसली
मैथुनांत रे असते झिंग;
दाखवितिल ते भोंक रिकामें
जिथें असावें मांसल लिंग.

पहा टाकुनी प्रश्न काय वा
निशाण तुमच्या हो बुध्दीचें;
घुमेल डमरुंतुन डोक्यांच्या
हास्य वाळलेल्या मज्जांचें.

अखेर होतां, किती विशाल
पुसेल कुणि जर त्यांचें अंगण;
दिसेल थोडें सफेद कांहीं,
जिथें असावें मांसल ढुंगण.

असशिल भोळ्या कुठें भैरवा,
उघड तुझे तर तिनही डोळे;
भस्म करी गा अतां तरी हे—
हे हाडांचे खडे सापळे !

वावडी वाद्यात माझी ! पोकळीचा पिंजरा !
सोड दोरी, जाउं दे ह्या कागदाच्या पाखरा !

ओळखीच्या ह्या ढगांचा रंग गेला गंजुनी,
ओतलेल्या ह्या नसांचा ढंग तेवीं पिंजुनी.
देठ बेंबीचा कुठें का सांधतो फांदी-फुला !
गेंद येतो तारकांचा आवसेच्या रात्रिला.

फाळ भंगे नांगराचा, शेत ओकी ढेकळां,
आणि माझ्या मायबापा, तूंहि खुपशी या गळां !
कातणीच्या जेविं पोटीं लक्ष अंडीं पोसती,
पोकळीच्या आंत तेवीं लाख वाती तेवती.

टाळुनीया त्यांस जाण्या आकसे ही वावडी,
सोड दोरी देवबाप्पा; वाळलीं हीं आतडीं.
वाळलीं हीं आतडीं अन् शब्द झाला कातडी;
सोड दोरी, जाउं दे रे ! काळ लोंबे या घडीं.

जाणतों मी पोकळीच्या पिंजऱ्यालाही गज
खास कोठें ना कुठें ते. आणि मीहि मर्त्यज.
फक्त दोरी सोड तूं रे, जाउं दे ही वावडी
खात गोते, पिंजऱ्याच्या त्या गजांशीं तेवढी !

.५८.

न्हालेल्या जणुं गर्भवतीच्या
सोज्ज्वळ मोहकतेनें बंदर
मुंबापुरिचें उजळित येई
माघामधली प्रभात सुंदर.
सचेतनांचा हुरूप शीतल;
अचेतनांचा वास कोवळा;
हवेंत जाती मिसळुनि दोन्ही.
*पितात सारे गोड हिवाळा !*

डोकीं अल्गद घरें उचलती
काळोखाच्या उशीवरूनी;
पिवळे हंडे भरून गवळी
कावड नेती, मान मोडुनी;
नितळ न्याहारिस हिरवीं झाडें
काळा वायू हळूच घेती;
संथ बिलंदर लाटांमधुनी
सागर-पक्षी सूर्य वेचती;
गंजदार, पांढऱ्या नि काळ्या
मिरवित रंगा अन् नारिंगी,
धक्क्यावरच्या अजून बोटी
साखरझोंपेमधीं फिरंगी;
कुठें धुराचा जळका परिमल,
गरम चहाचा पत्ती गंध;
कुठें डांबरी रस्त्यावरच्या
भुऱ्या शांततेचा निशिगंध;

ह्या सृष्टीच्या निवांत पोटीं
परंतु लपली सैरावैरा,
अजस्र धांदल, क्षणांत देइल
जिवंततेचें अर्घ्य भास्करा.

थांब! जरासा वेळ तोंवरी—
अचेतनांचा वास कोवळा;
सचेतनांचा हुरूप शीतल;
*उरे घोटभर गोड हिवाळा !*

पंक्चरली जरि रात्र दिव्यांनीं,
तरी पंपतो कुणि काळोख;
हसण्याचें जरि वेड लागलें,
भुंकतात तरि अश्रू चोख.

फत्कन बसली रबरी रात्र;
दुजी न टायर ह्या अवकाशीं;
राठ मनाच्या चाटित बसलीं
पापुद्र्यांच्या कुत्रीं राशी.

खांद्यावरती न्यावी रात्र
जमेल ज्याला त्यानें त्यानें;
डोळ्यांवरती जरा कातडें
ओढावें,—पण हसतमुखानें.

पंक्चरलेल्या रबरी रात्रीं
गुरगुरवावीं रबरी कुत्रीं ! !

आलों क्षणिंचा विसावा म्हणून;
टेकले पाय :
तों तूंच हटकलेंस ‘कोण’ म्हणून.
आणि मनांतले शिणलेले हेतू
शेण झाले.

# आणखी कांही कविता

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

भरून येइल हृदय जेधवां
शरीर पिळुनी निघेल घाम;
अन् शब्दांच्या तोंडांमध्यें
बसेल तूझा गच्च लगाम;

काळ्यावरतीं जरा पांढरें
ह्या पाप्याच्या हातुन व्हावें
फक्त तेधवां : आणि एरव्हीं
हेंच पांढऱ्यावरतीं काळें !

.१.

भंगुं दे काठिन्य माझें
 आम्ल जाऊं दे मनींचें;
येउं दे वाणींत माझ्या
 सूर तूझ्या आवडीचे.

ज्ञात हेतूंतील माझ्या
दे गळूं मालिन्य; आणि
माझिया अज्ञात टाकीं
स्फूर्ति-केंद्रीं त्वद्बियाणीं.

राहुं दे स्वातंत्र्य माझें
 फक्त उच्चारांतलें गा;
अक्षरां आकार तूझ्या
 फुप्फुसांचा वाहुं दे गा.

लोभ जीभेचा जळूं दे
दे थिजूं विद्वेष सारा;
द्रौपदीचें सत्त्व माझ्या
लाभुं दे भाषा-शरीरा.

जाउं दे कार्पण्य 'मी'चें,
 दे धरूं सर्वांस पोटीं;
भावनेला येउं दे गा
 शास्त्र-काट्याची कसोटी.

खांब दे ईर्ष्येस माझ्या
बाळगूं तूझ्या तपाचे;
नेउं दे तींतून मातें
शब्द तूझ्या स्पंदनांचे

दा. क्र. 10६0८

त्वत्स्मृतीचें ओळखूं दे
माझिया हातां सुकाणूं;
थोर-यत्ना शांति दे गा
माझिया वृत्तींत बाणूं.

आण तूझ्या लालसेची,
आण लोकांची अभागी;
आण माझ्या डोळियांची
पापणी ठेवीन जागी.

धैर्य दे अन् नम्रता दे
पाहण्या जें जें पहाणें;
वाकुं दे बुद्धीस माझ्या
तप्त पोलादाप्रमाणें;

घेउं दे आघात तीतें
इंद्रिय-द्वारां जगाचे;
पोळुं दे आंतून तीतें
गा अतींद्रियार्थ आंचें

आशयाचा तूंच स्वामी !
शब्दवाही मी भिकारी;
मागण्याला अंत नाहीं,
आणि देणारा मुरारी

काय मागावें परी म्यां
तूंहि कैसें काय द्यावें;
तूंच देणारा जिथें अन
तूंच घेणारा स्वभावें ! !

२.

बन बांबूंचें पिवळ्या गातें
आकाशांतिल अधोरेखितें;
चराचरांतिल दळते संज्ञा
जगण्याची (पण उद्यां) प्रतिज्ञा.

लिंब कोरतो सांवरशिंगी
जुनीं भाकितें नपुंसकलिंगी
ज्या वाऱ्यांतुन, त्यांत उमटलीं
नवीं पावलें, पण मेलेलीं.

शतशतकांच्या पायलन्सवरतीं
किती कावळे टिंबें देती;
उभा जागृतीं क्रियापदांचा
खडा पहारा, पण रोबोंचा.

अढळ ध्रुवाचा ढळला तारा
सप्तर्षींचा चुकला प्रश्न;
गारठल्याविण गळती गारा,
रेडिओंत अन् राधे क्रिश्न !

.३.

जिथें मारते कांदेवाडी
टांग जराशी ठाकुरद्वारा,
खडखडते अन् ट्रॅम वाकडी
कंबर मोडुनि, चाटित तारा;

त्या नाक्यावर तंग हवेली
उत्साहाची ठिगळ्या चोळी
घालुनि बसली, बोथटलेलीं
शिळीं स्तनाग्रें झाकित :
*(नका टाकून जाउं, चोळमोळा घाण्यानें माझा झाला...)*
—पवळी

अर्धोन्मीलित सकाळ खुपली
विस्कटलेल्या कौलारांतुन;
फटीफटींतुन खिडकीच्या अन्
निरभ्र गेली दुपार चावुन

आढ्यांना :
*(किति किति टांगूं तुला ग, मज चैन नसे...)*
पण धुर्कटलेल्या
जीर्ण उद्यांच्या आशेनें तर
तिष्ठत बघणें वाट; राखणें
लाज आणखी जनान्तिकांतर

नाक्यावरल्या हवेलीस या!
येणारा जरि कोण नि कुठला
कुणा न ठावा, तरी तयारी :
निळ्या माडिचा विडा निराळा!

*(झाडु मारी भैया, बालम बैया मरो रे...)*

रात्र संपली दिवस उगवला,
शिरीं धुरांचा कुरळ्या गेला
भांग फाटुनी! भांग फाटुनी!!

.४.

अभ्रांच्या ये कुंद अफूनें
पानांना ह्या हिरवी गुंगी;
वैशाखांतिल फांदीवरतीं
आषाढाची गाजर-पुंगी

मिटून बसलीं पंख पाखरें
पर्युत्सुक नच पीसहि फुलतें;
मूक गरोदर गाईची अन्
गळ्यांतली पण घंटा झुरते.

तिंबुन झाली कणीक काळी
मऊ, मोकळी ह्या रस्त्याची;
उष्ट्या अन्नामध्यें थबकली
चोच कोरडी बघ घारीची.

ब्रेक लागला चाकांवरतीं,
श्वासहि तुटला आग्‌गाडीचा;
ऊन उसासा धरणीच्या अन्
उरांत अडला इथें मघांचा.

शिरेल तेव्हां शिरो बिचारें
हवेंत असल्या पाउस-पातें;
जगास तोंवर वैशाखाच्या
मृगाविनाही मृगजल चढतें !

५.

कुणि मारावें, कुणी मरावें,
कुणी जगावें खाउनि दगड;
वितळवून कुणि आयुष्यांना
ओतावे अन् सोन्याचे घड.

कुणी रडावें, रडवावें कुणिं
कुणी हसावें पिऊन वायू;
कुणी दाबुनी जखम आजची
जरा उद्यांचा काढावा पू.

ह्या जगण्यांतुन, ह्या मरण्यांतुन
हसण्यांतुन अन् रडण्यांतुन ह्या,
अशाश्वताच्या मुठी वळूनी
अपाप वरतीं चढतिल बाह्या;

अखेर घेतां टक्कर जरि मग
युगायुगांचें फुटेल भाल;
अशाश्वताच्या समशेरीवर
शाश्वताचिही तुटेल ढाल!

. ६.

अस्थाईवर स्थायिक झालों,
चुकून गेला पहा अंतरा;
ओरडून का अतां लागणें
ढिल्या गळ्यावर पंचम गहिरा !

नशेंत झुकला निशापती अन्
अस्मानाच्या फळल्या तारा;
अंधारावर विझून गेला
रात्रीचा या वीज-पिसारा.

क्लिन्न मनोगत मोटारींचें
कुशींत शिरलें काळोखाच्या;
नालबंद अन् घोड्याची ये
टाप समेवर जिवंततेच्या.

शांत जगाच्या घामावरला
उडून काळा गेला वास;
बेटाबेटांतुनी मनांच्या
जराच हलला श्वासोच्छ्वास.

अस्थाईवर पुन्हा परतलों
चुकून गेला पहा अंतरा;
ढिल्या गळ्यावर षड्ज बांधणें
अतां खालचा परंतु हसरा.

"फुटेल (होती वेडी आशा)
आभाळाचा कर्मठ सांधा;
पडेल किंवा तडा भयंकर
वसुंधरेच्या अर्ध्या अंगा.

असें न कांही घडलें : फक्त
अनंत उठले सुतकी शब्द;
दो मिनिटांची सडी शांतता
शहारली अन् मिटली लब्ध—

प्रतिष्ठितांवर :"

—वदला पौष

जातां जातां या माघाला;
अन् इसवी सन कवायतीचा
कदम उचलुनी पुढें सरकला.

—अशींच जावीं कांहीं वर्षें,
आणि *महात्मा* यावा पुढचा;
अम्हांस आम्ही पुन्हा पहावें
काढुनि चष्मा डोळ्यांवरचा !

.८.

ह्या गंगेमधिं गगन वितळलें,
शुभाशुभाचा फिटे किनारा;
अर्ध्या हाकेवरी उतरला
बुद्ध-गयेचा पिवळा वारा.

विटाळलेलीं मनें उघडती
झापड-दारें आपोआप;
अन् चिखली ये विचकत वास
जणु पाप्याचा पश्चात्ताप.

सुरांत भरली टिटवीच्या कुणी
मृत्युंजयता भोळी, भगवी;
आणि अचानक शिवलीं गेलीं
ध्रुवाध्रुवांतिल कांही कडवीं.

अजाणत्याच्या आकांक्षांतिल
शंख-शिंपले येउन वरतीं,
उघड्या रंध्रांमधें अनामिक
गगन-गंध हा ठेवुन घेती.

इथेंतिथेंचें फुटलें खापर
डासळली अन् जरा ‘अहम्’ता;
उभ्या जगावर चढली अडवी
तव मायेची कमान आतां.

ह्या गंगेमधिं गगन वितळलें,
शुभाशुभाचा फिटे किनारा;
असशिल जेथें तिथें रहा तूं,
हा इथला मज पुरे फवारा !

.९.

गणपत वाणी बिडी पितांना
चावायाचा नुसतिच काडी;
म्हणायचा अन् मनाशींच कीं
ह्या जागेवर बांधिन माडी;

मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवयी,
भिरकावुनि ती तशिच द्यायचा
लकेर बेचव जैशी गवई.

गिऱ्हाइकाची कदर राखणें;
जिरें, धणे, अन् धान्यें गळित,
खोबरेल अन् तेल तिळीचें
विकून बसणें हिशेब कोळित;

स्वप्नांवरतीं धूर सांडणें
क्वचित् बिडीचा वा पणतीचा
मिण्मिण् जळत्या; आणि लेटणें
वाचित गाथा श्रीतुक्याचा.

गोणपटावर विटकररंगी
सतरंजी अन् उशास पोतें;
आडोशाला वास तुपाचा;
असें झोपणें माहित होतें.

काडें गणपत वाण्यानें ज्या
हाडांचीं हीं ऐशीं केलीं,
दुकानांतल्या जमीनीस तीं
सदैव रुतलीं आणिक रुतलीं.

काड्या गणपत वाण्यानें ज्या
चावुनि चावुनि फेकुन दिधल्या,
दुकानांतल्या जमीनीस त्या
सदैव रुतल्या आणिक रुतल्या.

गणपत वाणी बिडी बापडा
पितांपितांना मरून गेला;
एक मागतां डोळे दोन
देव देतसे जन्मांधाला !

.१०.

राहुं दे जिवंत । तगमग; खंत
मनांतील अंत । पावूं नेदी ॥

जुळविन अस्ति । प्रवाह नि नास्ति,
वीजेंत या वस्ति । व्हावी तूझी ॥

येथें नाहीं टाळ । मृदंग मराळ
नाहीं; नाहीं माळ । स्फटिकांची ॥

येथें नाहीं ध्यान । भक्ति वा भजन
नाहीं उदासीन । मनोवृत्ति ॥

जैसा कीं रोलर । रुळे रस्त्यावर
मागें चक्काचूर । खडी खडी ॥

कोटि-क्षण काल । भरडीत भाल
चालला विशाल । तैसा येथें ॥

येथें सारी कृति । एकच विकृति
ओल्या ओठीं रिती । आठवण ॥

येथें सारा भाव । एकच अभाव
डोळ्यांतील डाव । डोळा नेणें ॥

माझें मी अज्ञान । प्यालों निशिदिन
कोरडी तहान । आतां तूझी ॥

.११.

खप्पड बसली फिक्कट गाल
तळभिंतीवर घेउन जख्खड
मातीची ही जुनी झोपडी
आंबट मिनिटें चाखित रड्ड.

मधेंच दचकुनि बघते वरतीं,
अष्टदिशांचा सासुरवास;
चंद्रमौळि परि बेढब शबरी
क्षण-बोरांची रचिते रास.

मातीवरतीं करीत मात;
मिनिटांमधुनी काढित व्याधि;
तप्किरि-पिवळ्या मउ सालीचें
बोर गवसतां जरा सुगंधी,

कुरवाळित तें बोटांनीं मउ
मिनिट सुवासिक हसते शबरी;
माणुसकीच्या दंडकांत अन्
गौऱ्या थापित वदे शर्वरी :

येइल का कधिं सीतापति ग
चुकून तरि पण ह्या वाटेला ?
घेइल का अन् रुजू करूनी
ह्या बोरांच्या नैवेद्याला ?

कुठली सीता कुठला राघव ?
पुसे खडीचा रस्ता फक्कड;
आणि ठेविते गाल झोपडी
तळभिंतीवर फिरून खप्पड.

.१२.

[सुटींत एकत्र जमणाऱ्या मित्रांच्या करमणुकीसाठीं ही कविता लिहिली. पण 'अभिरुची'नें ती प्रसिद्ध केल्यानें आतां ती खाजगी गंमत म्हणून ठेवण्यांत अर्थ नाहीं.]

इरेस पडलों जर बच्चमजी
मुक्तछंद तर लिहीन मीही,
ऐसपैस अन् लफ्फेबाज
लुगड्याचा जणुं पदर इर्‌कली.

म्हणाल म्हणजे प्रतिभा यांची
अतां खरोखर पल्लेदार!
कुठें पूर्विंची काक-छत्रिसम,
कुठें अतां ही स्कायस्क्रपर!

इरेस पडलों जर बच्चमजी,
आशासूक्तें जीवनदर्शी
याद राख तर लिहीन मीही
जरा टण्टणित नि पारदर्शी.

म्हणाल म्हणजे मानवता ह्या
कविची आतां खरी विशाळ!
कुठें पूर्विंची कूपमंडुकी,
कुठें अतां ही अब्धि-गजाळ!

इरेस पडलों जर बच्चमूजी
तर भाषेची ऐशीतैशी
उलटीसुलटी करीन मीहि
भव्य भयानक विराट् कप्‌बशी.

प्रचंड, तांडव, वादळ, मत्त,
प्रमत्त आणिक 'प्र'कार इतर :
बंब पुकारिन आगीचा मी
ज्वलंत ह्या आग्‌काडीखातर.

म्हणाल म्हणजे मर्ढेकरच्या
अतां खरी जय ह्या कवितेकी !
कुठें पूर्विचीं गद्गळ गाणीं,
कुठें अहा ही ब्रासबँडकी !

कुणि प्राध्यापक आणि अचानक
म्हणेल : "एम्. ए.साठीं क्रमिक
वरें नेमण्या हें—जर पुस्तक
कराल जाडेंजुडें, प्रकाशक!"

.१३.

ठायीं ठायीं रूप तूझें । बघण्याचा केला दावा,
पीठ झालेल्या मनांत । लोकीं राघव पहावा ॥

पीठ लोटिती पिठांत । उरे चक्कीचा आवाज,
रूप लोपलें स्व-रूपीं । उरे डोळ्यांचीच खाज ॥

उसवली माणूसकी । तुझ्या नावानें शिवावी,
लोकीं हाडांच्या प्रदेशीं । हिर्वीं गोपूरें थाटावीं ॥

फाडी धागाच धाग्याला । उरे सुईवर रक्त
नांगरीतां हाडें हाडें । पेटे गंधकच फक्त ॥

विज्ञानाच्या वैभवाला । यावें शीर्षक उत्तम,
रुग्ण मनीं तुरटीचें । पाणी शिंपावें परम ॥

गेलें मोडून शीर्षक । हातीं आले खिळे; जळे
तुरटीची ‘परम’ता । तुरटीच्या आगीमुळें ॥

येथें जमेल कोष्टक । कधीं कधीं तरी का रे,
माझ्या गणिताची हाक । अध्याहृतांत वावरे ॥

नाहीं ठेवीला हातचा । एक आपुल्या बाहींत,
लोकीं शून्यांत म्हणूनी । वसवीलें का कोलीत ! ॥

.१४.

मनास पडलीं जर खिंडारें
भकास, थापा गाळ भीतिचा;
अन् धमन्यांतिल धारांवरतीं
बर्फ रचा मग जन-रीतीचा.

अंधाराचा धाक उदंड,
काळोखाची हाक अकल्पित;
ओल्या जिवणीमधील पाणी
पळविल ऐशी रात्र अशिल्पित.

भयाणतेच्या बुरुजावरुनी
येइल केव्हां शीळ अनामिक;
गिळा तिला अन् मंत्र आठवा
मनांतल्या पण मनांत, लौकिक :

—*"सह नौ टरक्तु !*
*सहवीर्यं डरवावहै !"*

अनुक्रम ................ वि: ..........
क्रमांक ................ नों: दि: ..........

.१५.

पांडुर संध्या चौथ्या प्रहरीं
विव्हळते जशि लाल फाटुनी,
भिकारडी कुणि अबला बाला
विव्हळली तशि डोळे मिटुनी;

अन् महिन्यांचा चार गळाला
गर्भ; वाहले रक्तपाट किति;
किती पट्कुरीं सांध्य ढगांसम
तांबुस-काळीं भिजलीं भवतीं.

प्रभात पांडुर पहिल्या प्रहरीं
थरथर कापत यावी तैशी
भिकारडी ती अबला आली
थरथर कापत दुसऱ्या दिवशीं;

अन् डोळ्यांमधिं घेउनि चांद
वदली : "बाई, आठ दिसांनीं
कामावरतीं येइन खास
तवर न ठेवा दुजि पर् कोनी."

घास भरविला बाईनीं तिज
रजा पगारी दिधली वरती,
नभांतुनी पण सकाळ-संध्या
मुखास काळें फासुनि फिरती.

१६.

मी एक मुंगी, हा एक मुंगी,
तो एक मुंगी, तूं एक मुंगी,
ही एक मुंगी, ती एक मुंगी,
पाच एथल्या, पाच फिरंगी;

सहस्र जमल्या, लक्ष, कोटिही,
अब्ज अब्ज अन् निखर्व मुंग्या;
अनंत अगणित साऱ्या जमल्या—
किती वारुळी, किती लफंग्या !

कुणी डोंगळे काळे काळे;
कुणी तांबड्या, भुरक्या मुंग्या;
कुंणि पंखांच्या पावसाळि वा
बेडर ग्रीष्मांतल्या लवंग्या !

सावधान कुणि रांग धरूनी
एकामागुन एक चालती;
कुणी बावळ्या अप्पलपोट्या
मिळेल साखर तेथें चरती;

व्रतस्थ बनती चावा काढित
कुणि; कुणि पाजित मधुरस इतरां
जन्म कंठती; फळविति कुणि अन्
सम्राज्ञीला प्रसन्न चतुरा !

ह्या मुंग्यांतिल एकेकीला
बनेल खाउनि राजा कोण;
पार्थिवतेच्या पराकोटिचें
अपार्थिवाला नेइल लोण ?

*—आला आला स्वस्त दरावर आला हो आला*
*ह्या मुंग्यांचा लोंढा आला! खोला, फाटक खोला!—*

दहा दहाची लोकल गाडी
सोडित आली पोकळ श्वास;
घड्याळांतल्या काट्याचा अन्
सौदा पटला दीन उदास.

ह्या नच मुंग्या : हींच माणसें :
असेच होते गांधीजीही,
येशु क्रिस्त अन् कृष्ण कदाचित्
कालिदास अन् टैकोब्राही.

ह्या नच मुंग्या—हींच माणसें,
मनें अनामिक जरि साऱ्यांचीं,
लक्तरलेल्या मिनिटांचा वर
सदैव बुरखा; लाज स्वतःची.

अंगावरतीं जिरलेले किति
तऱ्हेतऱ्हेचे मादक घर्म;
अन् वासांची त्यांच्या कॉक्टेल
तर्र झोकुनी फलाटफार्म.

जशि पाप्याची नजर फिरावी
अनोळखीच्या उरावरुनी,
ह्या साऱ्यांची भेकड वृत्ती
वावरते तशि जगण्यामधुनी.

ह्या नच मुंग्या : हींच माणसें :
मायबाप अन् भाऊबहिणी
ह्यांना असती; होतिल आणिक
मुलें मुली अन् पुतण्या पुतणी.

*—सालोसाल मरूं दे मेला ! रेस भराभर फळवूं दे !—*

चिखलामधुनी चिखल उडावा,
अनामिकानें नाव धरावें;
आपत्तींच्या मुळ्या उकळतां
त्या अर्कावर स्वप्न जमावें.

करपट दुःखीं इंगित शिथिल,
नाव सोनुली, वाळा कथली;
भरल्या घरिंही भ्रष्ट भावना
फुटकळ आशा मोजित बसली.

आठवणींचे पिकले काठ,
वास मारते जगलोलुपता;
कुजक्या शंका कितीक दिसतिल
वरवरची कातडी सोलतां;

जुन्यापुराण्या उत्साहाचें
खलास झालें कालच तेल;
अवसानाचा उसन्या क्लच का
किती दाबला तरि पावेल;

देवाघरचा शाप देउळीं
हपीसांत अन् ताप उद्यांचा;
चिमणीं मिनिटें उडून जाती
फक्त हुंगुनी दाणा मनिंचा.

अशा येथल्या संसारांत
जगण्याचाही चुकला पाढा;
आणि शेवटीं परिस्थितीचा
गळ्याखालतीं उतरे काढा.

*—सर्वे जन्तु रुटिनाः । सर्वे जन्तु निराशयाः ॥*
*सर्वे छिद्राणि पंचन्तु । मा कश्चिद् दुःख-लागू भरेद् ।*

.१७.

जशि धोब्याची मऊ इस्तरी
तलम फिरावी सुतावरुनी,
फाल्गुनांतली चंद्रकोर तशि
मलिन मनांच्या धाग्यांवरुनी.

शिणेल धोबी यदाकदाचित्,
पडेल खालीं चंद्रकोर अन्,
सुरकुतलेल्या मनोवृत्तिंना
पुनश्च कोठें भट्टी भगवन !

.१८.

ओठांवर आली पूजा । भरे मनांत कापरें
ओल्या पापांचीं वाळून । झालीं वातड खापरें ॥

पापांतून पापाकडे । जाई पाप्याचा विचार
आणि पुण्याचीं किरणें । लोळतात भुईवर ॥

माथीं घेतलें गा ऊन । कटींखांदीं काळेंबेरें
तुझ्या आवडीचा क्षण । डोळ्यांतून मागें फिरे ॥

गढूळला तोही क्षण । मतलबाच्या मातीनें
कैसें पोसावें त्यांवर । आर्द्र स्वप्नांना स्वातीनें ॥

घड्याळांत आतां फक्त । एक मिनिट बाराला
रात्रही का वैऱ्याचीच । घालशील गा जन्माला ! ॥

.१९.

संडासांतिल घाण जिरावी
जमीनींत अन् यावें रोप;
निमूळत्या ह्या सेकंदांवर
चढवावा कुणि 'जरि'चा टोप.

ह्या जन्मांतुनि असेंच जाणें
आज-उद्यांची लावित संगत;
कुणि पेरावा घाम आणखी
झोडावी कुणि अखंड पंगत.

भव्य भीतिचें होउनि जाइल
ओझरतेंही जर का दर्शन,
छोट्यामोठ्या किती भितींचा
खडा पहारा हसेन पाहुन!

.२०.

सांदीला पण सोवळ्यांत जो
आजवरी हा देव ठेवला,
धरावयाच्या मुळ्या फांदिनें
ओवळ्यांत तर प्रभूस ढकला.

.२१.

ह्या दुःखाच्या कढईची गा
अशीच देवा घडण असूं दे;
जळून गेल्या लोखंडांतहि
जळण्याची, पण पुन्हा, ठसूं दे
कणखर शक्ती, ताकद जळकट.

मोलाची पण मळूल भक्ति
जशि कुंतीच्या लिहिली भाळीं,
खिळे पाडुनी तिचे जरा ह्या
कढईच्या दे कुट्ट कपाळीं
ठोकुनि पक्के, काळे, बळकट.

फुटेल उकळी, जमेल फेस,
उडून जाइल जीवन-वाफ;
तरि सांध्यांतुन कढईच्या ह्या
फक्त बसावा थोडा कैफ
तव नामाचा मेसुर धुरकट.

.२२.

सत्तेजाच्या जंजाळामधिं
तपोनिधे, तूं कोण अनामिक ?
सादशून्य अन् हिरमुसलेल्या
थंड दिगंतीं स्थिर वैमानिक ?

.२३.

झोपलीं ग खुळीं बाळें,
झोप अंगाईला आली;
जड झाली शांततेची
पापणी ह्या रित्या वेळीं.

चैत्र बघतो वाकून
निळ्या नभांतून खालीं;
आणि वाऱ्याच्या धमन्या
धुकल्या ग अंतराळीं.

शब्द अर्थाआधीं यावा
हें तों ईश्वराचें देणें;
पेंगणाऱ्या प्रयासाला
उभ्या संसाराचें लेणें.

चैत्र चालला चाटून
वेड्या सपाट पृथ्वीला,
आणि कोठें तरी दूर
खुजा तारा काळा झाला.

आतां भ्यावें कोणी कोणा !
भलें होवो होणाऱ्याचें;
तिरीमिरींत चिंचोळ्या
काय हाकारावे वेचे.

चैत्र चढे आकाशांत
नीट नक्षत्र-पावलीं;
आणि निळ्या वायूंतून
वाट कापी विश्ववाली.

वेड्याविद्या नि वाकड्या
मनाआड मनें किती;
चाळणींत चाळणी अन्
विचारांत तरी माती.

चैत्रबापा, उद्यां या हो
घेउनीया वैशाखाला;
—आंबोणीच्या मागें कां ग
तुझा माझा चंद्र गेला ?—

आंबोणीच्या मागें पण
अवेळीं कां चंद्र गेला ?

.२४.

आलों होतों आलों होतों
होतों जाणार जाणार
कां रे अंमळशा-पोटीं
तरी साठवीसी जार.

सामान्याला सनातन
नातें अनंत कालाचें,
वैष्णवाच्या टिळ्यावर
ठोके गाजती सालांचे

कोठें अब्रू कची चाड,
आडपडदा आयुष्य;
मात्र संभावितांसाठीं
खालीं पाट, वर पुष्य.

चपापला पापी जीव
फक्त एथल्या घाईनें
बोलायाचें कांहीसें अन्
राहील का ह्या भीतीनें.

.२५.

दवांत आलिस भल्या पहाटीं
शुक्राच्या तोऱ्यांत एकदां;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरल पावलांमधली शोभा.

अडलिस आणिक पुढें जराशी
पुढें जराशी हसलिस;
—मागें
वळुनि पाहणें विसरलीस का ?
विसरलीस का हिरवे धागे ?

लक्ष्य कुठें अन् कुठें पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा;
डोळ्यांमधल्या डाळिंबांचा
सांग धरावा कैसा पारा !

अनोळख्यानें ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग !

तळहाताच्या नाजुक रेषा
कुणि वाचाव्या, कुणी पुसाव्या;
तांबुस निर्मल नखांवरी अन्
शुभ्र चांदण्या कुणि गोंदाव्या !

दवांत आलिस भल्या पहाटीं
अभ्रांच्या शोभेंत एकदां;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

.२६.

अभ्ररम्य पश्चिमनीं मोकळ्या तुझिया केसांतुन
सांग फेकिले सप्तरंग कुणि तिरप्या तेजांतुन;

आळविली कुणि निळ्या नसांतुनि तुझिया चंचलता,
आणि ठेविली अपाप भाळीं चिमणी संदिग्धता;

कुणि पानांच्या शिरांशिरांतिल वासंतिक वक्रता
निथळविली अन् भरली तुझिया देहीं मधु आढ्यता;

काय कोवळ्या कळ्याकळ्यांची कुणि नाकेबंदी
करुनि वळविली तुझ्या दिशेनें उन्मीलन-संधी;

अचल हिमाचल पाहुनि चळला तव मांगल्याला
आणि हनूवर उत्सुकता लव उमटवुनी गेला;

किति अधरांच्या थरकापांतुन धावत ही आली
एक वेगळी अधीरता अन् भिवयांवर लपली;

तव हास्यांतिल स्निग्ध अकल्पित व्हावें शिल्प पुरें
काय थांबले म्हणून येथें कालाचे वारे !

अवघड आशा, उसनी भाषा, उसना उच्चार,
उसने हेतू, तसेच किंतू, उसने आजार;

चुकल्या निद्रा, अडखळलीं अन् स्वप्नें; संकेत
ठेच लागली तिथेंच बसले शबल समाधींत :

ह्या सर्वांतिल गर्व आणखी गरळ गिळावें गे,
शिथिल मनांतिल कथील व्हावें सोनें अन् वेगें;

त्या सोन्यानें उजळुन जावें मुलुखाचें मिनिट
म्हणुनि धाडिलें तुला देउनी जडतेचा किरिट.

ये तर येथें सजव आणखी सजीवतेला ह्या
चराचरावर तव स्फूर्तीच्या अन् विलसोत सह्या !

.२७.

भटकत फिरलों भणंग आणिक
मिळेल तेथें पाणी प्यालों;
जुळेल तेथें खूण जुळविली
तरि होतों हा तसाच उरलों.

शिंपित आलिस तोंच माधुरी
सहज नाचऱ्या डोळ्यांमधली,
सांडावी जशि थेंबांची सर
चांदण्यांत कुणि झाडावरली.

आणि कालची तहान मेली
गळ्यांत कोरड दुसरी आज;
व्यर्थ नव्हे का ओंजळ जेथें
शरीर सारें म्हणतें पाज !

ओठ वाळला कालचाच तरि
आज निराळी लाही त्यावर;
शब्दांचे कुणि करोत चमचे,
'आ' बनलें हें सारें अंतर !

.२८.

रहा तिथें तूं जिथें आपुल्या
हृदयामधली काच तडकली;
आणि बिलोरी आशांमधुनी
कालाची बघ चीर उमटली.

उनाड नाड्या होतिल संथ,
मनोरथांचे थकतिल तावुत;
थंड मनांतिल थडग्यांभवतीं
प्रश्नचिन्ह अन् उरेल फक्त.

अशा एकल्या पातळ वेळीं
पाताळांतुन येइल अपसुख
क्षीण वेदना धुंडित एक
ह्या काचांतिल चीर पराङ्मुख.

असावीस तूं त्या वेळीं गे
इथेंच, जेथें काच तडकली;
आणि बिलोरी आशांमधुनी
कालाची ही चीर उमटली.

.२९.

घडल्या गोष्टी विसरुनि जा अन्
नडल्या आशा चुलींत फेका;
जिवंतता जर असेल रोमीं
मरण तिच्यांतिल थोडें हुडका.

कितीक मरती नित्य नव्यानें,
श्राद्धाची पण जुनीच रीत;
बंद जाहल्या हृदयांतुनही
तडफत हसती शब्दातीत.

बेकंबेचे तेच परोचे;
जुनीच भाषा, नवे भरोसे;
जुन्या कल्पना, नवीं तर्पणें
तींच गिरमिटें, नवीन वळसे !

निदान आतां घडल्या गोष्टी,
नडल्या आशा चुलींत फेका;
कानांवरतीं हात ठेवले
नाडीचा तरी बंद न ठेका.

३०.

तुझ्यासाठीं देवा । काय म्यां झुरावें
झुरळानें कैसें । पतंगावें ॥

साधुसंत जेथें । बैसले तिष्ठत
मना कष्टवीत । अहोरात्र ॥

काय तेथें माझी । लांडी धडपड
किरटी पकड । भावनेची ॥

काय बोलूं आतां । उघड नाचक्की
अंतरांत पक्की । बोळवण ॥

३१.

किती तरी दिवसांत
नाहीं चांदण्यांत गेलों;
किती तरी दिवसांत
नाहीं नदींत डुंबलों.

खुल्या चांदण्याची ओढ
आहे माझी ही जुनीच;
आणि वाहत्या पाण्याची
शीळ ओळखीची तीच.

केव्हा तरी चांदण्यांत
पुन्हा जाईन निर्भय;
गावाकाठच्या नदींत
होईन मी जलमय.

आज अंतरांत भीति
खुल्या चांदण्याची थोडी;
आणि नदीचा प्रवाह
अंगावर काटा काढी.

बरा म्हणून हा इथें
दिवा पारवा पाऱ्याचा;
बरी तोतऱ्या नळाची
शिरीं धार, मुखीं ऋचा.

.३२.

अजून येतो वास फुलांना,
अजून माती लाल चमकते;
खुरट्या बुंध्यावरी चढून
अजून बकरी पाला खाते.

अस्मानावर भगवा रंग
आणि नागवें समोर पोर;
अजून डुलक्या घेत मोजतें
ह्या दोहोंतिल अंतर ढोर.

भूकंपाचा इकडे धक्का
पलीकडे अन् युद्ध-नगारे;
चहूंकडे अन् एकच गिल्ला,
जुन्या शवांवर नवे निखारे.

फत्तरांतला देव पाहतो
कुठें जहाली माझी फत्ते;
माणुस म्हणतो चिरंतनाचे
मनांत माझ्या अस्सल कित्ते.

चढेल तुसडीं तेढीं नातीं,
नश्वरतेंतहि चिरका नखरा;
शिजत्या मांसामधून कोणी
स्वर्ग हुंगतो बुलंद बहिरा.

सटीक मानवतेची टिपणी
पुन्हा वाचली अर्थ तोच तरि;
आभाळाच्या पल्याड स्पंदन
टिपरी त्याची ह्या मडक्यांवरि.

जगून थोडें अखेर मरणें
उघडझाप ही डोळ्यांचीच;
अंधारांतुन राडाराचा
किरण चालला सलत पुढेंच.

कार्तिकांतलें गव्हाळ ऊन
जरी मनाची अशा रितीनें
फाडुनि बघतें ढिली कातडी
जखम आतली जुन्या भितीनें;

तरीहि येतो वास फुलांना,
तरीहि माती लाल चमकते;
खुरट्या बुंध्यावरी चढून
तरीहि बकरी पाला खाते;

अस्मानावर भगवा रंग
आणि नागवें समोर पोर;
तरीहि डुलक्या घेत मोजतें
ह्या दोहोंतिल अंतर ढोर !

—*"अहो बत महद्भाग्यं द्रष्टुं व्यवसिता वयम्"* —

.३३.

असें कांही तरी व्हावें
अशी दाट होती इच्छा;
असें कांही तरी झालें
पुरवितें तेंच पिच्छा.

पैलथडीं पिके आंबा
ऐलथडीं हे शहारे;
कुणा भाग्यवंतासाठीं
मध्यें वाकतात वारे

ओल्या वाळूंतून वर
येई रसाळ सुवास;
आणि मनांतील बिया
देती हळूच आळस.

असें कांहीसें होईल
अशी फार होती आशा;
असें कांहीसें झालेलें
पाहतांच थिजे भाषा.

३४.

अंधाऱ्या जगाची । हीच रीतभात
काजळाची वात । काळोखाला ॥

काळ्या हवेंतून । काळेंच विमान
घेतसे उड्डाण । अंधारांत ॥

नाहींत सिग्नल । हिरवे वा लाल
कैची दिशाभूल । अदृश्यांत ॥

जेथें जातों तेथें । मी माझा सांगाती
डोळ्यांच्याच भिंती । झाल्या ऐशा ॥

३५.

जमीन म्हणते मीच धावतें
पळणारा पण दुजाच कोण;
वारा म्हणतो सुरांत माझ्या
प्रचंड आळसले पाषाण.

रेताडावर ताड माजतो
खाज आपुल्या शेंड्याचीच;
अस्मानांतुन विमान तरतें
ऐट आपुले पाय अडीच.

आरोळ्यांची राळ उडवुनी
पहाड केला जागा म्हणती;
हाडांवरतीं कमल लावुनी
इस्पितळांतुन विश्व उगवती.

देवासाठीं दगड पूजिला
मानवतेची अतां आरती;
संस्कृत झाला शब्द म्हणुनि का
देव्हाऱ्यावर नवीन कांति !

दगड गाडला, गाडा हाडें;
शेंदुर गेला, रक्त जाउं द्या;
अज्ञानाच्या गळफासांतच
जरा जगा अन् जरा जगूं द्या.

नळींतलें जग नळींत जगतें
उगाच रुसवा रसायनाचा;
उगाच दावा मानवतेचा
आणिक डंका सामर्थ्याचा !

किती पायीं लागूं तुझ्या
किती आठवूं गा तूंतें;
किती शब्द बनवूं गा
अब्द अब्द मनीं येतें.

काय गा म्यां पामरानें
खरडावी बाराखडी;
आणि बोलावीं उत्तरें
टिनपट वा चोमडीं.

कधीं लागेल गा नख
तुझें माझिया गळ्याला,
आणि सामर्थ्याचा स्वर
माझिया गा व्यंजनाला!

# असंग्रहित

.१.

संपली आशा अतां अन् निराशाही मावळे;
ओसाडलेल्या मन्मनीं साद देती कावळे.

प्रेम केलें, व्यर्थ गेलें! हो टवाळी मात्र ही;
मित्र ज्यांनीं म्हणविलें ते, तेहि हसती प्रत्यहीं.
"शिष्ट मोठे प्रेम करण्या लागुनी गेले पहा!
ध्येयवादी! शून्यबुद्धि! भावना-पोते अहा!!"
शब्द येती हेचि कानीं : बोल लोकां कां उगा!
बोल दैवा वावगाची; प्रेम भाग्याचा फुगा!
प्रेम भाग्याचा फुगा हा, फार भरतां फाटणें
धर्म त्याचा; त्या निनादें धर्म लोकीं हासणें.
दोष माझा वा तुझा ही फोल भाषा येथ गे;
पापपुण्यापार होतां प्रांत अपुला एक गे.
दोष माझा वा तुझा हा न्याय करणारे स्वतः
कोण आम्ही?—डाचते ज्यां रोमरोमीं अंधता.
दीन दुबळी वाटली जी आर्द्र संस्कृत लीनता,
संयमानें खुलविलेली जाणुनी तेजस्विता;
तूंच एका शांत रात्रीं शीण आलेल्या शिरा
देत असतां एक मांडी, वाकलेल्या तव उरा
चंद्र आणी तारकांनीं वा दिव्यांनीं पाहिलें;
दैवी दोषी, मीच अथवा—न्याय देवो ते भले.

दैव दोषी, मीच अथवा—न्याय देवो ते भले!
ओसाडलेल्या मन्मनीं साद देती कावळे.

.२.

“माझे हे पति; मित्र हे;” —परिचया देई करूनी वधू;
हस्तांदोलन हो; सगर्व पतिच्या आनंद राजे मुखीं.
मित्राच्या हृदयांतुनी परि स्मृती ज्या दाविती वाकुल्या,
एकेक स्मृति त्यांतली पति-मुखा “Oh, hell” म्हणाया पुरे.

## .३. माधवराव पटवर्धन

जुंपलेले बैल गाडी ओढती ओढाळही
जूं चुकेना; माखते ही मान रक्तें प्रत्यहीं;
मर्त्य तेवीं माणसांनीं विश्व-चाकोऱ्यांतुनी
जीवनाच्या गाडियाचा भार न्यावा, साहुनी
जूं अतर्क्या बेगुमानी विश्व-इच्छाशक्तिचें.
मानहीनां मान कैची! मर्त्य ना मेलेच ते.
फक्त तूझी स्वाभिमानी चाल बेडर् वृत्तिची;
पीळ पायीं हिम्मतीचा; टाप इच्छाशक्तिची;
बंडली तेजस्विता अन् अंतरींची मर्दता,
फेस तोंडीं—हासलेली आत्मश्रद्धाशुद्धता !
मान मुर्गाळून ओढी विश्व-इच्छेची धुरा,
आणि झाली सांज, आला बैलगाडा हा घरा.

टपटपां पण् रक्त गळलें विश्व-चाकोऱ्यांवरी;
थेंब त्याचे वाळलेले धीर देती अंतरीं.

## .४. ॐ नमः सावल्ये !

जावें विसरूनी स्वतःस । लागावा तुझा तुझाचि ध्यास
अज्ञानाच्याचि आसपास । ज्ञान व्हावें ॥

निघाल्या सारवूनी कडा । जाणिवेच्या आणि थोडा तडा
यावा भरूनियां बापडा । भावनेचा ॥

होतां छिन्नविच्छिन्न अंतरीं । काय बाळगावे तुकडे तरी
जेथें सर्वस्वानेंच फितुरी । केली असे ॥

जैसें थोबाड रंगुनी लाल । होतां अवघडे शिशु-बोल
शब्दावीण तैसा ताल । दुःख धरी ॥

दुःख सावरावें डोळ्यांत । रात्र भाजावी राखेंत
जेथें रस्ताच नाहीं तेथें वाट । आडमार्ग ॥

पाप परमेश्वराची साल । तीच माझें वल्कल, तीच शाल
तुझ्या इच्छेचाचि जाणावा परवल । पावलांनीं ॥

होमावीण द्यावी आहुति । हीच अगतिकाची सद्गति
जेथें उक्तीच नाहीं द्विरुक्ति । तेथ कैची ॥

उरीं बाळगिलें मीपण । व्हावें तेंचि आतां इंधन
जें जळतां जळतांचि जावें दिपुन । सावलीनें ॥

.५.

एवढ्याशा तळ्यांत बदकं चार;
पलिकडला कांठ अन् हिरवागार;
फुलतात फुलं वासंतिक,
झुलतात पांखरं (प्रासंगिक).

भातुकली-आठवण एवढीशी
आठवायची पण कधीं कशी !
रडू बाई रडू,
(आठवण कडू)
वरसंन् वरसं इथें अशी !
आठवायची ही एवढीशी—

(गोड अन् कडू)
रडू बाई रडू !

## .६. आला आषाढ-श्रावण

आला आषाढ-श्रावण
आल्या पावसाच्या सरी;
किती चातकचोचींनें
प्यावा वर्षा ऋतू तरी !

काळ्या ढेकळांच्या गेला
गंध भरून कळ्यांत;
काळ्या डांबरी रस्त्याचा
झाला निर्मळ निवांत.

चाळीचाळींतून चिंब
ओलीं चिरगुटें झालीं;
ओल्या कौलारकौलारीं
मेघ हुंगतात लाली.

ओल्या पानांतल्या रेषा
वाचतात ओले पक्षी;
आणि पोपटी रंगाची
रान दाखवितें नक्षी.

ओशाळला येथें यम,
वीज ओशाळली थोडी;
धावणाऱ्या क्षणालाही
आली ओलसर गोडी.

मनीं तापलेल्या तारा
जरा निवतात संथ;
येतां आषाढ-श्रावण
निवतात दिशा-पंथ.

आला आषाढ-श्रावण
आल्या पावसाच्या सरी;
किति चातक-चोचींनें
प्यावा वर्षा ऋतू तरी !

## .७. फक्त तुझी जर दगडी भिवयी

हासडल्या तुज शिव्या तरीहि
तुझ्याच आलों पायीं लोळत;
मुठींत धरुनी नाक, लाविले
तव डोळ्यांशीं डोळे पोळत.

कधीं जन्मली पृथ्वी ? जसल्या
निळ्या वायुच्या लगडी सलग
कधीं ?
कधीं अन् जडतेला त्या
मनामनाचें आलें पोत ?

तेजाच्या अन् निळ्या नळींतुन
जसा फुलावा निळसर चाफा,
सपोत संज्ञेमधून तैसा
अनुभूतींचा फुलला वाफा

कधीं ?
पहावें तेजांतुन ह्या
काय ?
कुणाला शोधावें अन् ?
दळभद्याच्या आग लागली
पायाखालीं इथें अचेतन !

खंत कशाला जिरेल का रंग
आकाशाची ? जगेन पोळत;
फक्त तुझी जर दगडी भिवयी
चळेल थोडी डोळ्यांदेखत !

हासडल्या तुज शिव्या तरीहि
तुझ्याच आलों पायीं लोळत;
मुठींत धरुनी नाक, लाविले
तव डोळ्यांशीं डोळे पोळत.

.८.

जरा असावी मरणाचीही
अमोघ आणिक दुबळी भीती;
जरा आंतड्यांमधून यावी
अशाश्वताची कळ ओझरती.

.९.

—आणि मृगाचा पाउस आला,
जरा लाजली काळी धरणी :
"व्यर्थ कासया शिणविसि, देवा,
गळ्यांत माझ्या फुटका रे मणि !"

...संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ विः ............
क्रमांक ............ नोंः दिः ............

.१. *[‘शिशिरागम’चें प्रास्ताविक]*

## उत्तरवारा म्हणाला—

“वसंतांत फुटलेली पालवी, मंद वायूबरोबर डुलणारीं आणि वृक्षपोषण करून करून त्यावर फुलांचे व रसाळ फळांचे घोंस आणणारीं कोमल पानें शरद् ऋतूपर्यंत सृष्टिसौंदर्यांत भर घालीत रसिकांना अल्पस्वल्प आनंद देत होतीं. हेमंतांत जीवितकार्य संपविण्यास सुरुवात करून शिशिरागमनाचे वेळीं तीं उत्तरवाऱ्याची, हिमतुषारांची, बर्फगारांची मार्गप्रतीक्षा करीत आहेत.

अनेक शिशिर आले नि गेले. झाडाखालीं पानांच्या पाचोळ्याचा जमलेला दाट थर बराचसा मातींत मिळून गेला. अनेक असहाय पानें उत्तरवाऱ्या-बरोबर उडत, गिरक्या खात दिगंताला गेलीं. उरलींसुरलीं थोडींशीं कडे-कपारींत अचानक अडकून राहिलीं. कडेकपारींतल्या या पानांवरल्या शिरांच्या जाळ्यांत गतकालीन उत्कट भावना अस्पष्ट उमटलेल्या दिसतात. मळूल शुष्क देठ, जरठ पिवळा कुरतडलेला पर्णभाग आणि शिरा अशा जीर्ण देहांतच त्या भावना तग धरून असतात.”

एका दुर्गम कड्याच्या कपारींत सुदैवानें कांहीं पानें सापडलीं तीं हीं. शिरांच्या जाळ्यांत अंधुक दिसणाऱ्या नायकांत किंवा नायिकेंत अनेक तरुण वाचकांना स्वानुभवाचा अस्पष्ट ठसा आढळेल कदाचित्! शुष्क पानांच्या शिराजालावर तैली रंगाचे कुशल कुंचले नाजुक हातानें ओढून कुणी रसिक त्या पार्श्वभूमीवर स्वभावना रंगवील; कुणी मऊ बहुरंगी रेशमी धाग्यानें नायकाच्या नशिबीं न आलेलें सुखान्त चित्र भरील; कुणी पानें नीट जुळवतां जुळवतां डोळ्यांत नकळत उभे राहिलेले दोन उष्ण अश्रुबिंदु त्या शिराजालावर टाकील; दुःखद स्मृति जागृत करणाऱ्या या शुष्क

पानांचा राग येऊन कुणी त्यांचा चोळामोळा करील; न जाणो, आनंदी सृष्टिसौंदर्याचा एकादा भोक्ता वीट येऊन या शुष्क पानांना दृष्टिआड करील; किंवा एकादा अजाण बालक बिचाऱ्यांना तुच्छतेनें हिणवील...

झाडानें टाकलें, हिमतुषारांनीं गोंजारलें, गारांनीं झोडपलें आणि उत्तर-वाऱ्यानें गिरक्या खात उन्हातान्हांत सोडलें. आतां पुन्हा तोच उत्तरवारा त्या पानांचे शुष्क सांगाडे एकत्र करीत करीत तेथें आला आणि म्हणाला—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०६०८
ग्रंथ शाखा स्थळ प्रत

—श्रीधर बाळकृष्ण रानडे

## २. [ 'कांहीं कविता'चें प्रास्ताविक ]

'शिशिरागम' प्रसिद्ध झाल्याला आठ वर्षं झालीं. त्यानंतरच्या ह्या पांचपन्नास कविता.

शद्बांवर थोडी हुकमत असली आणि लय तोंडवळणीं पडली म्हणजे कविता लिहिणं फारसं कठीण नसतं. त्यापलीकडे कांहीं पुढील लिखाणांत आहे किंवा नाहीं हें वाचकच ठरविणार. त्यांचं मत अनुकूल पडलं नाहीं तर लेखकानं योग्य तो बोध घ्यावा. पण 'भूमिके'चा टोप चढवून आणि तळटीपांचे पैंजण घालून नकटीला शारदेचं सोंग घ्यायला लावणं हा त्यावर तोडगा खास नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २४६६० वि: ७२/०४
दिनांक १.४.२०० नोंः दिः ३/३/५८

—बा. सी. मर्ढेकर

## कै. मर्ढेकरांचीं
## आगामी पुस्तकें

- 'नटश्रेष्ठ' हें एक अप्रकाशित नाटक आणि 'कर्ण', 'बदकांचें गुपित' व 'औक्षण' या तीन संगीतिका
- सौंदर्य आणि साहित्य
  कांहीं निबंधांची भर घालून दुसरी आवृत्ति
- 'कला आणि मानव'
  'Arts and Man' चें रा. भि. जोशांनीं केलेलें भाषांतर
- 'तांबडी माती', 'रात्रीचा दिवस' व 'पाणी' या कादंबऱ्या

## आणखी कांहीं
## कवितासंग्रह

- शीळ
  ना. घ. देशपांडे
- नीहार
  पद्मा
- मृगजळ
  इंदिरा
- यान्त्रिक
  शरच्चंद्र मुक्तिबोध